आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

उत्सव लॉन्स अँण्ड बँक्वेट्स
utsav LAWNS & BANQUETS
सोहळा होईल दिमाखदार
लग्न, साखरपुडा, मौंज, वाढदिवस, कॉर्पोरेट इव्हेंट्ससाठी सुयोग्य ठिकाण.
एसी बँक्वेट हॉल | भव्य लॉन | प्रशस्त पार्किंग | AC रूम्स
बुकींग संपर्क - 7410 510 376 | 7385 951 303

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २९.०९.२०२५ | अंक नं. १५२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

सर्व दागिन्यांची
प्रतीग्रॅम मजुरी
₹ 888/-*
डबल फायदा
+
जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी
चक्क फ्री*
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

ना गिफ्टची लालच...
ना लकी ड्रॉची
भुरळ ! फायदा हा
सर्व ग्राहकांचाच !
मजुरी फक्त
६.९ %
मे. शिंगवी ज्वेलर्स
- सोने, चांदी व रत्ने -
हत्ती चौक, सर्जेपुरा, अहिल्यानगर-४१४००१
७८७५७७७००१

# अहिल्यानगर शहरात रस्त्यावरील आक्षेपार्ह रांगोळीवरून धार्मिक तणाव

## पळापळ झाल्याने बाजारपेठेतील काही दुकाने बंद; मुस्लिम समाजाचा रास्ता रोको, दगडफेक, जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांचा लाठीचार्ज

नगर – अहिल्यानगर शहरात दुर्गामाता दौडच्या स्वागतासाठी रस्त्यावर काढलेल्या रांगोळीत 'आय लव्ह मोहम्मद' हे नाव लिहून त्यावरून दौड काढण्याचा प्रयत्न केल्याची घटना माळीवाडा परिसरातील बारा तोटी कारंजा येथे २९ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. या घटनेमुळे मुस्लिम समाजाने कोतवाली पोलिस ठाणे गाठले. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, पोलिस ठाण्याबाहेर जमावाने निदर्शने करत धुडगूस घालण्याचा प्रयत्न केल्याने पोलिसांनी जमावावर सौम्य लाठीचार्ज केला. त्यानंतर मुस्लिम समाजाच्या जमावाने कोठला परिसरात महामार्गावर रास्तारोको आंदोलन सुरू केले. त्याला वेगळे वळण लागून काही वाहनांवर दगडफेक करण्यात आली. पोलिसांनी लाठीमार करत जमावाला पांगवले. या घटनेमुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, २९ सप्टेंबर रोजी सकाळी बारातोटी कारंजा परिसरात दुर्गामाता दौडच्या स्वागतासाठी फुलांची रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीत इंग्रजी अक्षरात प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे नाव रेखाटण्यात आले होते. त्यानंतर या नावावरून दौड नेण्यासाठी व्यवस्था करून देत जाणीवपूर्वक अपमान केला, मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्याप्रकरणी आरती संग्राम रासकर व संग्राम आसाराम रासकर (रा. बारा तोटी कारंजा) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख अल्तमश सलीम जरीवाला यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी एकास ताब्यात घेण्यात आले आहे.

### कोठला परिसरात महामार्गावर रास्तारोको

या घटनेनंतर व पोलिसांनी केलेल्या लाठीमारामुळे आक्रमक झालेला मुस्लिम समाज कोठला परिसरात महामार्गावर उतरला. जमावाने महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले. आंदोलनादरम्यान काही युवकांनी रस्त्यावरील वाहनांवर दगडफेक केल्याने आंदोलनाला वेगळे वळण लागले. पोलिसांनी तत्काळ आंदोलकांवर लाठीमार करत जमावाला पांगवले. त्यामुळे पळापळ झाली. या घटनेमुळे कोठला परिसरात व संपूर्ण शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपअधीक्षक शिरीष वमने यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरून परिस्थिती नियंत्रणात आणली. कोठला परिसरात दगडफेक व तोडफोड प्रकरणी २२ युवकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

### अचानक दगडफेक सुरु झाल्याने पोलिसांचा लाठीमार

अहिल्यानगरचे पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या प्रकरणी एका समाजकंटकाला अटक करण्यात आल्याची माहिती दिली. ते म्हणाले, आज सकाळी कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत रोडवर रांगोळी काढण्यात आली होती. त्या रांगोळीवर मुस्लिम समाजाच्या लोकांनी आक्षेप घेतला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच ज्यांनी रांगोळी काढली त्याला अटकही करण्यात आली होती. त्यानंतरही काही मुस्लिम समाजाच्या लोकांनी कोठला येथे रस्त्यावर येऊन रास्ता रोको केला. पोलिसांनी त्यांना तेथून निघून जाण्याची सूचना केली, त्यांना विनंती केली. पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यांनी अचानक दगडफेक सुरू केली. त्यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करून जमाव पांगवला. यावेळी काही लोकांना ताब्यात घेण्यात आले. पोलिस पुढील कारवाई करत आहेत. मी सर्वच समाजाच्या लोकांना याद्वारे आवाहन करतो की, कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नये. अहिल्यानगर शहरात शांतता आहे. दगडफेक करणाऱ्या समाजकंटकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, असे पोलिस अधीक्षक म्हणाले. *(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)*

कुठे आहात तुम्ही दिवाळी आणि ख्रिसमसच्या सुट्टीत ?
कुठे जायचं.. कसं जायचं.. अजुन ठरत नाहीये ?
ठरवा लवकर छुट्टीवाला मोसममध्ये फॅमिली सोबत
हॉलिडेवर जाण्याची संधी दवडू नका..
लागलीच बुकींग करा.. निश्चिंत व्हा !
VEENA WORLD
लेह, लडाख, हिमाचल, नॉर्थ ईस्ट, सिक्कीम, नेपाळ, भुतान, शिमला-मनाली, नैनीताल, सिंगा-मले-थाय, व्हिएतनाम, कंबोडिया, बाली
चलो बॅग भरो.. निकल पडो...

| | |
|---|---|
| हायलाईटस् ऑफ केरळ 37,000/- पासून सुरुवात (पुणे ते पुणे) ६ दिवस | हायलाईटस् ऑफ राजस्थान 42,000/- पासून सुरुवात (पुणे ते पुणे) ६ दिवस |
| नैनिताल मसूरी हरिद्वार 53,000/- पासून सुरुवात (पुणे ते पुणे) ६ दिवस | थायलंड 54,000/- पासून सुरुवात ४ दिवस |
| फुकेट क्राबि 49,000/- पासून सुरुवात ४ दिवस | वारानसी-आयोध्या-लखनऊ 62,000/- पासून सुरुवात ८ दिवस |
| दुबई 90,000/- पासून सुरुवात ५ दिवस | नैनिताल मसुरी हरिद्वार 45,000/- पासून सुरुवात ६ दिवस |
| भुतान 90,000/- पासून सुरुवात ९ दिवस | नेपाळ 78,000/- पासून सुरुवात ८ दिवस |
| शिमला-मनाली 35,000/- पासून सुरुवात ६ दिवस | सिंगापुर मलेशिया थाय 1,71,000/- पासून सुरुवात १० दिवस |
| हायलाईटस् ऑफ अंदमान 65,000/- पासून सुरुवात ५ दिवस | हायलाईटस् व्हिएतनाम 1,07,000/- पासून सुरुवात ५ दिवस |

वीणा वर्ल्ड प्रेफर्ड सेल्स पार्टनर
राजलक्ष्मी हॉलिडेज्
कालिका प्राईड, २ रा मजला, ऑफिस नं. २०६, लालटाकी रोड, अहमदनगर.
प्रसाद श्रीकांत मांढरे
9112384842
9850063432

SHUBH REALITY
Member of CREDAI
आमचे स्वप्न झाले साकार..
आणि तुमचे.. ?
या दसऱ्याला आपणही सर्व सुखसोयींनी परिपुर्ण अशा आपल्या हक्काच्या घरात प्रवेश करा आपले स्वप्न साकार करा.
रेडी पझेशन घर
₹ 11,000/- बुकिंग रक्कम
1&2 BHK व टेरेस फ्लॅटही उपलब्ध.
• आकर्षक व दर्जेदार बांधकाम
• नामांकित बँकेतुन गृहकर्ज उपलब्ध
• एमआयडीसी लगत आपल्या हक्काच्या घराचा भव्य प्रकल्प..
• रेरा अंतर्गत रजिस्टर्ड प्रोजेक्ट
₹ 10.10 लाखापासुन पुढे*
प्रोजेक्ट बाय : शुभ रियालिटी
थोडेच फ्लॅट शिल्लक
PMAY 2.0 SUBSIDY 1.80 Lacs.*
प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेता येणे शक्य.
स्वप्न साकार
MAHA RERA
RERA REG NO. P5220026167
Scan for Rera
मोरया पार्क जवळ, जिमखाना रोड, बोल्हेगांव, एम.आय.डी.सी., ता.जि. अहिल्यानगर
बुकिंगसाठी संपर्क : 70 3000 1006/7

कमी ऐकू येते का ?
signia Life sounds brilliant...
कंपनीचे अधिकृत विक्रेते
• न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
• ३१ वर्षापासून सेवेत
• इंग्लडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
• लहान मुलांच्या तपासण्या
• स्पीच थेरपी
15% Discount
स्थापना : १९९२
साई हिअरिंग क्लिनिक
साई सर्जिकल ॲण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अ.नगर.
मो. 83800 41240
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)

डॉ. अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

महाराष्ट्रातील सर्वात खस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतं..?
दसरा दिवाळी ऑफर..
* कॉटन एक्स्पोर्ट रुमाल white 120 रु डझन
* टर्किश टॉवेल जम्बो एक्स्पोर्ट कॉटन ₹ 799 चा ₹ 299/- रुपयात
* रेमंड डबल बेड ब्लॅंकेट ₹ 4999 चे ₹ 1199/- रुपयात
* king size 108 x 108 आणि 120 x 120 size चे
* बेडशीटची सर्वोत्तम रेंज ₹ 599/- पासून ते ₹ 1999/- पर्यंत
मार्केट पेक्षा वेगळं पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
ACCOUNTING
CERTIFICATE COURSE IN ADVANCE
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING
ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
IN JUST 17900/-
100% JOB ASSISTANCE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 9371051769
Old ST stand Branch: Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 7447761769
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# केडगावमध्ये बंद घर फोडून रोकड व दागिन्यांची चोरी

नगर - शहरात घरफोड्यांचे सत्र सुरूच असून, चोरट्यांनी केडगाव येथील पिंक सिटी परिसरात एका महिलेच्या बंद घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने आणि रोख रकमेसह एकूण ४१ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शुभांगी वाघमारे (वय ५५ रा. पिंक सिटी, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी काही दिवसांपूर्वी भिंगार येथे राहणाऱ्या आपल्या मुलीकडे गेल्या होत्या. त्यामुळे त्यांचे घर बंद होते. अज्ञात चोरट्यांनी २४ सप्टेंबरच्या रात्री ते २५ सप्टेंबरच्या सकाळच्या दरम्यान त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला. घरात कोणी नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी बेडरूममधील कपाटाचे लॉकर तोडून त्यातील सामानाची उचकापाचक केली.

लॉकरमध्ये ठेवलेले २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे नेकलेस, १० हजार रुपयांचे सोन्याचे झुमके, एक हजार रुपयांचा चांदीचा शिक्का आणि ५ हजार रुपयांची रोकड असा एकूण ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर शेजाऱ्यांनी तात्काळ फिर्यादीला फोन करून माहिती दिली. माहिती मिळताच फिर्यादीने घरी धाव घेऊन पाहिले असता, घरात चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन अज्ञात चोरट्याविरोधात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, पुढील तपास सुरू आहे.





कोठला परिसरात महामार्गावर रास्ता रोको करताना मुस्लिम समाज, दुसऱ्या छायाचित्रात या ठिकाणी अचानक दगडफेक सुरु झाल्याने जमावाला पांगवण्यासाठी लाठीचार्ज करताना पोलिस, तर तिसऱ्या छायाचित्रात घटनास्थळी दाखल झालेले पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे. (छाया - धनेश कटारिया, बबलू शेख)

# अहिल्यानगर शहरात रस्त्यावरील आक्षेपार्ह रांगोळीवरून धार्मिक तणाव

(पान १ वरुन)

## दुर्गामाता दौड मार्गावर हाडे व मांसाचे तुकडे फेकल्याचा आरोप

नगर शहरात दुर्गामाता दौड ही संभाजी भिडे यांच्या नेतृत्वातील शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे आयोजित करण्यात आली होती. या दौडच्या मार्गावर हाडे व मांसाचे तुकडे फेकल्याचा आरोप केला जात आहे. याबाबत देविदास भीमराव मुदगल (वय ४५, रा. गाडगीळ पटांगण, नालेगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हटले आहे की, आम्ही गेल्या २५ वर्षांपासून बसस्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते मंगलगेट अशी दुर्गामाता दौड काढत आहोत. २९ सप्टेंबर रोजी आम्ही सर्वजण त्यासाठी जमलो होतो. दौड जाणाऱ्या मार्गावर ठिकठिकाणी रांगोळी काढण्यात आली होती. आमची दौड ही माळीवाडा, केवल हॉस्पिटल ते बुरुडगल्ली जात असताना बॉम्बे बेकरी जवळ या मार्गावर कोणी तरी अज्ञात समाजकंटकाने हाडे व मांसाचे तुकडे फेकल्याचे निदर्शनास आले. यामुळे आम्हा हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात समाजकंटका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नागरदेवळे येथे गळफास घेत एकाची आत्महत्या

नगर - नगर शहराजवळील नागरदेवळे येथे एकाने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना २८ सप्टेंबर रोजी रात्री ८.४० वाजण्यापूर्वी घडली. संतोष सुरेश नन्नवरे (वय ३५, रा. नागरदेवळे, ता.नगर) असे मयताचे नाव आहे.

संतोष यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्याच्या नातेवाईकांनी रुग्णवाहिका बोलावून त्यास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. कोल्हे यांनी त्यांना तपासून ते उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले.

याबाबतच्या अहवालावरून भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत संतोष यांच्या पश्चात आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

# शहरातील वादग्रस्त फलक व हिंदूंना झालेल्या मारहाण प्रकरणी कारवाई करण्याची आ.संग्राम जगताप यांची पोलिसांकडे मागणी



शहरात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कोतवालीचे पो.नि. संभाजी गायकवाड यांच्याशी चर्चा करताना अ.संग्राम जगताप.

नगर - शहरात सकाळी माळीवाडा भागात झालेल्या रांगोळी प्रकरणामुळे शहरात वातावरण तापले आहे. अशात मुस्लिम समाजाकडून कोतवाली पोलीस स्टेशन समोरच लावण्यात आलेल्या वादग्रस्त फलक व हिंदू तरुणाला झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ आ.संग्राम जगताप यांनी संबधितांवर कडक कारवाई करण्याच्या मागणीसाठी कोतवाली पोलीस ठाण्यात २ तास ठिय्या दिला.

कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संभाजी गायकवाड यांनी आ.संग्राम जगताप यांच्याशी चर्चा करून कारवाईचे आश्वासन दिले. यावेळी हिंदुत्ववादी संघटनांचे कायकर्ते कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ.संग्राम जगताप म्हणाले, हिंदूंचा पवित्र नवरात्र उत्सव सुरु आहे. मात्र शहरात काहींनी जातीय तेढ निर्माण करणारे फलक लावून मुद्दाम जातीय तेढ निर्माण करत आहेत. हे फलक त्वरित काढण्यात यावेत.

नवरात्री निमित्त काढण्यात आलेल्या हिंदूंच्या दुर्गामाता दौड सुरु असताना काहींनी हिंदूंच्या भावना दुखावतील, असे कृत्य केले आहे. कोतवाली पोलीस स्टेशन जवळच हिंदू युवकाला विनाकारण मारहाण केली आहे. या सर्व घटना निंदनीय असून हिंदूंच्या भावना दुखावणाऱ्या आहेत. त्यामुळे पोलिसांनी संबधितांवर कडक कायदेशीर कारवाई करावी. शहरातील सर्व नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठवता शांतात ठेवावी, असे आवाहन केले.

## लताबाई भिंगारदिवे यांचे हृदयविकाराने निधन



भिंगार - येथील पंचशीलनगर परिसरातील रहिवासी श्रीमती लताबाई रविंद्र भिंगारदिवे (वय ६०) यांचे २७ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले.

त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, चुलते, चुलत्या, चुलत भाऊ, चुलत बहीण असा परिवार आहे व पोलिस कर्मचारी अनिकेत रविंद्र भिंगारदिवे यांच्या त्या मातोश्री होत.

## तुळशीराम निक्रड यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सांडवे येथील रहिवासी तुळशीराम तुकाराम निक्रड (वय ६७) यांचे २९ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर सांडवे अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, पत्नी, सुन, जावई नातवंडे असा परिवार आहे. ते अमोल निक्रड यांचे वडील होत.

## राजाराम कोरी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बोल्हेगाव येथील रहिवासी राजाराम रामसुफल कोरी (वय ७०) यांचे २७ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे १ भाऊ, ३ मुले, सुना, १ मुलगी, जावई, भावजय, नातवंडे असा परिवार आहे. शैलेंद्र, निलेश, उमेश कोरी यांचे ते वडील होत. छोटेलाल कोरी यांचे बंधू होत.

## सिंधुबाई कारवाळ यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील सिंधुबाई शिवाजी कारवाळ (वय ७८) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. बांधकाम व्यावसायिक सुनिल कारवाळ, अनिल व प्रकाश कारवाळ यांच्या मातोश्री, संजय व संतोष कारवाळ यांच्या चुलती, प्रफुल्ल व मनोज कारवाळ यांच्या आजी होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# ओला दुष्काळ जाहीर करून पूरग्रस्तांना व शेतकऱ्यांना तात्काळ भरघोस मदत देवून संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी पालकमंत्र्यांच्या दालनाबाहेर केले 'जागरण गोंधळ'

## दोन दिवसांत उपाययोजना करा अन्यथा मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर गोंधळ : संभाजी ब्रिगेड

नगर - ओला दुष्काळ जाहीर करून पूरग्रस्तांना व शेतकऱ्यांना तात्काळ भरघोस मदत देवून संपूर्ण कर्जमाफी करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली. महाराष्ट्रात काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे महाभयंकर पूरस्थिती निर्माण झाली असून ग्रामीण भाग, शेती आणि शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत. शेतजमिनी खरडून गेल्या, गावोगावे पाण्याखाली गेले, जनावरे व गुरेढोरे मृत्युमुखी पडले, घरदार, संसारोपयोगी साहित्य तसेच मुलांचे शैक्षणिक साहित्य यांचे मोठे नुकसान झाले आहे. हाताशी आलेले पीक वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांची जगण्याची उमेद संपुष्टात आली असून येणाऱ्या काळात आत्महत्यांचा धोका निर्माण झाला आहे. या भीषण परिस्थितीत सरकारने कोणतेही निकष न लावता तिजोरी खुली करून पूरग्रस्तांना भरघोस मदत करावी, हेक्टरी किमान १ लाख रुपयांची मदत, गुराढोरांना बाजारभावानुसार नुकसानभरपाई तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे.



भीषण परिस्थितीत सरकारने कोणतेही निकष न लावता तिजोरी खुली करून पूरग्रस्तांना भरघोस मदत करावी, हेक्टरी किमान १ लाख रुपयांची मदत, गुराढोरांना बाजारभावानुसार नुकसानभरपाई तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी प्रश्नावर जागरण गोंधळ आंदोलन छेडले. सरकारने पुढील २ दिवसांत योग्य ती उपाययोजना केली नाही तर मुख्यमंत्री यांच्या वर्षा बंगल्यावर गोंधळ घालण्याचा इशारा या आंदोलनादरम्यान देण्यात आला.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष राजेश गणपतराव परकाळे, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष इंजी. शाम जरे, पारनेर तालुकाध्यक्ष सचिन काकडे, नगर तालुकाध्यक्ष महेश दानवे, तसेच सुयोग धस, दिलीप वाळुंज, बापू जगताप, अच्युत गाडे, तरटे तात्या, विकास उदगीरे, अंबादास जाधव, संदीप मांडरे, सागर भोस, शंतनु जाधव, अमोल आगलावे, देविदास गवळी, विकास पवार, दिलीप आगलावे, संतोष कोकाटे, सुभाष आगलावे, बालू बोरुडे, धोंडीराम आगलावे आदी उपस्थित होते.



अतिवृष्टी मुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत ओला दुष्काळ जाहिर करावा. या मागणीचे निवेदन अप्पर जिल्हाधिकारी श्री. गीते यांना शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आनंदराव शेळके यांनी दिले.

# अहिल्यानगर जिल्हात ओला दुष्काळ जाहिर करा

## शिवसेनेची मागणी

नगर - अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदार संघात अतिवृष्टी मुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत ओला दुष्काळ जाहिर करावा. या मागणीचे निवेदन अप्पर जिल्हाधिकारी श्री. गीते यांना शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आनंदराव शेळके यांनी दिले. यावेळी डॉ. करणसिंह गाडे, पांडुरंग घोरपडे, डॉ. गुलाम शेख, दामोदर भालसिंग, अनिल भिंगारदिवे, पोपट पाथरे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, गेल्या मे २०२५ पासुन अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदार संघात सतत अतिवृष्टी झाल्यामुळे शेतक-यांचे मोठे शेती पीकाचे तसेच मालाचे नुकसान झालेले आहे. काही पिके वाहून गेली आहेत. शासनाने तातडीने संबंधीत यंत्रणेला आदेशीत करुन शेतीचे पंचनामे करुन त्वरीत मदत जाहीर करावी व तात्काळ अहिल्यानगर दक्षिणमध्ये ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषी मंत्री, महसूलमंत्री, पालकमंत्री यांना पाठवण्यात आल्या आहेत.

# दांडिया खेळताना झालेल्या वादातून तरुणावर चाकूने वार

## बोल्हेगाव परिसरातील घटना, तीन तरुणांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - दांडिया खेळतांना झालेल्या किरकोळ वादातून एका २१ वर्षीय डिलिव्हरी बॉयवर चाकू आणि धारदार शस्त्राने हल्ला केल्याची घटना बोल्हेगाव परिसरात घडली आहे. ओंकार अनिल शिंदे (रा.ब्राम्हण गल्ली, भिंगार) असे जखमी युवकाचे नाव असून, त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी ओंकार शिंदे याने दिलेल्या जबाबावरून ओंकार वाघ (रा. नंदनवन हॉटेल जवळ टिळक रोड, अ.नगर) व त्याच्या दोन अनोळखी साथीदारांविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ओंकार शिंदे हा २५ सप्टेंबर रोजी रात्री आपल्या मित्रांसोबत संजोग लॉन येथे दांडिया खेळण्यासाठी गेला होता. यावेळी त्याची तोंडओळख असलेल्या ओंकार वाघ याने जवळ येऊन त्याला जास्त हवेत उडू नको अशी धमकी दिली होती. दांडिया खेळून झाल्यावर रात्री सव्वादहाच्या सुमारास ओंकार शिंदे आपल्या मैत्रिणींना सोडण्यासाठी बोल्हेगाव येथील दत्त मंदिरा जवळून जात होता.

यावेळी पाठीमागून आलेल्या ओंकार वाघ व त्याच्या दोन साथीदारांनी ओंकार शिंदेच्या दुचाकीला धडक देऊन त्याला खाली पाडले. 'कोणी मध्ये आले तर मारून टाकीन' अशी धमकी देत ओंकार वाघ याने ओंकार शिंदेच्या पोटावर चाकूने वार केला. तर ओंकार वाघच्या इतर साथीदारांनी धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी केले. या हल्ल्यात ओंकार शिंदे रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. हल्ल्यावेळी घाबरल्याने त्याचे मित्र आणि मैत्रिणी पळून गेले. त्यानंतर एका अनोळखी व्यक्तीने त्याला रुग्णालयात दाखल केले. ओंकार शिंदे याने दवाखान्यात उपचार घेताना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# मार्निंग वॉक करणाऱ्या महिलेचे सोन्याचे गंठण हिसकावले; गुन्हा दाखल

नगर - एमआयडीसी परिसरातील वनराई कॉलनी येथे सकाळी मार्निंग वॉक करीत असताना दुचाकीवर आलेल्या दोघांनी महिलेच्या गळ्यातील मिनीगंठण हिसकावून नेले. ही घटना २७ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अनिता नंदकुमार बांगर (रा. वनराई कॉलनी, एमआयडीसी) यांनी पोलिसांत फिर्याद दिली. फिर्यादीत म्हटले. २७ सप्टेंबर रोजी सकाळी सहा वाजता मैत्रिणीसोबत मार्निंगवॉक करीत असताना पाठीमागून दुचाकीवर दोन तरुण आले. कट मारल्यासारखे करून त्यानी गळ्यातील मिनीगंठण हिसकावून गजानन कॉलनीच्या दिशेने पळून गेले. या फिर्यादीवरून पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला असून गुन्ह्याचा तपास उपनिरीक्षक महाजन करीत आहेत.

यु फोम, बॉन्डेड फोम, हिटलॉन फोम, फोम मॅट्रेसस्, बेड बॅक, सोफा क्लॉथ, फर्निशिंग क्लॉथ, वेलवेट क्लॉथ, सोफा कव्हर्स, सोफा रनर पट्टी, फ्रेमसह नविन सोफा तयार करुन मिळेल
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

तुमचे फिटनेस रुटीन बनवण्यासाठी, तुमचे ध्येय ठरवा, तुमच्या दैनंदिन जीवनात शारीरिक हालचाली समाविष्ट करा, आणि एक संतुलित दिनचर्या तयार करा ज्यामध्ये कार्डिओ (चालणे, धावणे), स्ट्रेंथ ट्रेनिंग (स्क्वॉट्स, पुश-अप्स) आणि लवचिकतेचे व्यायाम (स्ट्रेचिंग) यांचा समावेश असेल. हळू सुरुवात करा, विश्रांतीसाठी वेळ द्या, आणि नियमितता राखण्यासाठी तुम्हाला आवडतील असे व्यायाम निवडा. पुल-अप व्यायाम हा शरीराच्या वजनाचा व्यायाम आहे. ज्यामुळे शरीराला चांगला आकार मिळतो. याचा तुमच्या शरीराच्या अनेक भागांवर परिणाम होतो. याला कंपाऊंड व्यायाम असेही म्हणता येईल. हे करण्यासाठी पुल-अप बार वापरला जातो. जर कोणी घरी असे केले तर आपण उंचीवर ठेवलेल्या रॉडचा वापर करू शकता. असे केल्याने पाठीला चांगला आकार येतो. शक्य तितक्या जास्त पुल-अप करण्याचा प्रयत्न करा. सेलिब्रिटींनाही ते करायला आवडते. त्याच बरोबर चालणे, धावणे, सायकल चालवणे किंवा नृत्य करणे यांसारखे व्यायाम तुमच्या हृदयासाठी चांगले असतात.

## पाककला

### उपवास शेंगदाणा बर्फी

**साहित्य :** एक कप शेंगदाणे, काजू, बदाम, १/४ कप नारळाचे तुकडे, तीन चमच मावा, १/२ कप गूळ, एक चमचा तूप

**कृती :** सर्वात आधी शेंगदाणे, काजू, बदाम आणि नारळाचे तुकडे भाजून घ्या. आता शेंगदाण्याचे कवच काढून टाका आणि सर्व भाजलेले साहित्य मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या. आता तूप गरम करा, मावा घाला आणि परतून घ्या. माव्यात गूळ घाला आणि वितळेपर्यंत शिजवा. व शेंगदाण्याचे मिश्रण घाला आणि तूप वेगळे होईपर्यंत अर्धा मिनिटे शिजवा. आता एका प्लेटला तूप लावून तयार मिश्रण प्लेटवर पसरवा. थंड झाल्यावर, इच्छित आकारात कापून घ्यावे.

## सल्ला

✻ एक्झॉस्ट फॅनमधून चिकट तेल काढण्यासाठी डीग्रीसिंग, शक्य असल्यास हलक्या हाताने वेगळे करणे आणि इलेक्ट्रिकल भागांची सुरक्षित हाताळणी आवश्यक आहे.

✻ सर्किट ब्रेकरवर वीज बंद करा किंवा युनिट अनप्लग करा. पंखा चालू होत नाही याची खात्री करा.

✻ थेंब पडू नये म्हणून कापड किंवा जुने टॉवेल खाली ठेवा. हवेशीर क्षेत्रात काम करा.

✻ अहातमोजे, डोळ्यांचे संरक्षण, स्क्रूड्रायव्हर्स, ब्रश, मायक्रोफायबर कापड, डिस्पोजेबल चिंध्या आणि लहान भागांसाठी एक कंटेनर ठेवा.

✻ हवेतील तेल आणि ओलावा साफ करण्यासाठी स्वयंपाक केल्यानंतर पंखा जास्त वेळ चालू ठेवा. वापरानुसार दर ६-१२ महिन्यांनी पंखा स्वच्छ करा.

## वास्तू

हळदीचा संबंध भगवान विष्णूशी आहे. यामुळे पूजा किंवा धार्मिक विधीमध्ये हळदीला खूप शुभ मानले जाते. अशा परिस्थितीत, जिथे भगवान विष्णू निवास करतात, तिथे माता लक्ष्मी निश्चितच असते. धन आणि समृद्धी मिळविण्यासाठी, तिजोरीत हळदीचा एक गोळा ठेवा. यामुळे माता लक्ष्मीचा आशीर्वाद राहतो आणि संपत्तीत सतत वाढ होत असते.

## सौंदर्य

मलाईमध्ये लिंबाचा रस आणि अर्धा चमचा मध घाला. ही पेस्ट पूर्णपणे मिसळा आणि चेहऱ्यावर आणि मानेवर लावा. २० मिनिटे तसेच राहू दिल्यानंतर स्वच्छ पाण्याने धुवा आणि चेहरा कोरडा करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ३० सप्टेंबर २०२५

**दुर्गाष्टमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, पू.षा. अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**वृषभ :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**मिथुन :** एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**सिंह :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**कन्या :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**तूळ :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**वृश्चिक :** इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**धनु :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.


**मकर :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कुंभ :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**मीन :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२७३ सौ.शैलजा कुलकर्णी



### शब्दगंध क्र. ७२७२ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) द्विज; ब्राह्मण ३) जाणीव असलेला; शहाणा; समज असलेला; ज्ञानी ७) सभेचा प्रमुख ८) मनातील विचार; मानसिकता ९) गुंग; रममाण; मग्न; लीन १०) प्राणसंचार; जीवनशक्ती; बुद्धी १२) इमारतीच्या भोवतालची कुंपणाच्या आतील मोकळी जागा १३) बुद्धी १४) जाणीव; समज; ज्ञान १५) माह; महिना; माहे १६) भास्कर; रवि; सूर्य १७) 'कॉम्प्युटर'चे मराठी रूप १९) शहरातील जुना भाग; पुण्यातील एक पेठ २०) एक झाड; वटवृक्ष २१) हुलकावणी; बतावणी; गप्प २२) कुंपणाचा मोठा दरवाजा

**उभे शब्द :-** १) विसरणारा; विसराळू; स्मरणात न ठेवणारा २) पहाट ३) एकदा करेन म्हटल्यावर केल्याशिवाय सुटका नाही असे काम ४) हंगाम; युग ५) धर्मार्थ देणे ६) जीभ; जिव्हा; एक पेय ११) नाव उतरून जाण्याजोगी लहान खाडी; त्याअर्थी १२) उभे राहिले असता ज्याचे दोन्ही हात गुडघ्याच्या खालपर्यंत येतात असा १३) जेथे प्रेतांवर अंत्यसंस्कार केले जातात ती जागा; स्मशान १५) तपास; शोध; पत्ता १६) आहे असे वाटणे पण प्रत्यक्षात नसणे अशी स्थिती १७) कामबंद आंदोलन; हरताळ १८) ताठर; निबर; तापट; कठीण १९) श्रम; मेहनत

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आत्मसमाधान ही खरी समृद्धी आहे; ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'रेडीयम'चा शोध कसा लागला?

मेरी आणि पियरे क्युरी यांनी १९ व्या शतकात पिचब्लेंड नावाच्या खनिजात रेडियमचा शोध लावला. त्यांनी पिचब्लेंडच्या किरणोत्सर्गी गुणधर्मांचा अभ्यास केला आणि त्यातील अज्ञात घटकाचा शोध घेतला, जो युरेनियमपेक्षा जास्त किरणोत्सर्गी होता. अनेक रासायनिक प्रक्रिया करून त्यांनी या नवीन घटकाला रेडियम असे नाव दिले.

मेरी क्युरी यांनी पिचब्लेंडच्या किरणोत्सर्गी गुणधर्मांचा अभ्यास सुरू केला. त्यांना आढळले की हे खनिज युरेनियमपेक्षा कितीतरी पटीने जास्त किरणोत्सर्गी होते. त्यांनी पिचब्लेंडमध्ये पोलोनियम आणि नंतर रेडियम या दोन नवीन, अधिक किरणोत्सर्गी मूलद्रव्यांचा शोध लावला. रेडियमला वेगळे करण्यासाठी आणि शुद्ध करण्यासाठी त्यांनी अनेक रासायनिक प्रक्रियांचा वापर केला. यामध्ये फ्रॅक्शनल क्रिस्टलायझेशन या पद्धतीचा वापर करण्यात आला.

या मेहनतीनंतर, मेरी क्युरी आणि आंद्रे डेबिएर्न यांनी अनेक ग्रॅम अत्यंत शुद्ध रेडियम क्लोराईडचे उत्पादन केले आणि धातूच्या स्वरूपात रेडियम वेगळे केले. या शोधासाठी मेरी आणि पियरे क्युरी यांना १९०३ मध्ये भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. मेरी क्युरी यांना नंतर रेडियमच्या शोधासाठी १९११ मध्ये रसायनशास्त्राचे नोबेल पारितोषिकही मिळाले.

### दुर्गा देवै नमोस्तुभ्यम्

प्राचीन काळी, दुर्गम नावाचा एक राक्षस होता. त्याने ब्रह्मदेवाला प्रसन्न केले आणि सर्व वेदांवर ताबा मिळवला, ज्यामुळे देवांची शक्ती कमकुवत झाली. दुर्गमने देवांना पराभूत केले आणि स्वर्गावर ताबा मिळवला. मग देवांना देवी भगवतीची प्रार्थना केली. त्यांनी शुंभ-निशुंभ, मधु-कैतभ आणि चंड-मुंड यांना मारणाऱ्या शक्तीचे आवाहन केले.

देवांच्या हाकेला, देवी प्रकट झाली. तिने देवांना त्यांच्या हाकेचे कारण विचारले. सर्व देवांनी एकमताने घोषित केले की दुर्गम नावाच्या राक्षसाने सर्व वेद आणि स्वर्ग ताब्यात घेतले आहे आणि त्यांच्यावर असंख्य दुःखे आणली आहे. त्याचा वध करा, अशी मागणी त्यांनी केली. देवांचे शब्द ऐकून देवीने त्यांना आश्वासन दिले की ती दुर्गमचा वध करेल.

राक्षसांचा राजा दुर्गम याला हे कळताच त्याने पुन्हा देवांवर हल्ला केला. देवी भगवतीने देवांचे रक्षण केले आणि दुर्गमच्या सैन्याचा नाश केला. सैन्याचा नाश पाहून दुर्गम स्वतः लढायला आला. त्यानंतर, देवीने काली, तारा, चिन्नमस्ता, श्रीविद्या, भुवनेश्वरी, भैरवी आणि बगला यासारख्या अनेक सहाय्यक शक्तींना आवाहन केले आणि त्यांना युद्ध करण्यास प्रेरित केले. भयंकर युद्धात देवी दुर्गाने दुर्गमचा वध केला. दुर्ग राक्षसाचा वध केल्याने देवीला दुर्गा हे नाव मिळाले.

## जीवन का अमृत (भाग १)



अगर हमने अपने आपको जानना है, परमात्मा को पाना है तो हम अपना ध्यान बाहर से हटाएं। संत तुलसी साहिब ने फ़रमाया है :

**दिल का हुजरा साफ कर**
**जानां के आने के लिए।**
**ध्यान गैरों का उठा उसके बिठाने के लिए ।**

अगर इस जिंदगी का ध्येय पूरा करना है तो हम अंतर्मुख हों, शब्द के साथ जुड़ें, इस दुनिया से ध्यान हटाकर अंदर की दुनिया में जायें। किसी महापुरुष की शरण में पहुँचकर शब्द की कमाई करें, वे हमें अन्दर के मंडलों में रसाई करा देंगे। यह रास्ता सीखा नहीं जा सकता, ख़रीदा नहीं जा सकता, पढ़ाई से पाया नहीं जा सकता, लेकिन किसी महापुरुष की शरण में आकर पकड़ा जा सकता है।

परमात्मा को हम कैसे पूजें? वह प्रश्न मानव जाति के लिए आदि काल से चला आया है और अंत तक रहेगा । प्रश्न-चेतन है ! क्या जड, नाशवान वस्तुएं उसकी पूजा में रखी जा सकती है?

### गुरू और परमात्मा

प्रेम भरी आत्मा प्रभु को प्रिय है । कवियों की भाषा में दिल का अर्थ होता है आत्मा, हृदय का अर्थ होता है आत्मा ।

संत रविदास जी फरमाते हैं :

**मन ही पूजा मन ही धूप ।**
**मन ही सेऊं सहज स्वरुप ।।**

मंदिर किस लिए बनाए जाते हैं, गुरुद्वारे किस लिए बनाए जाते हैं, मस्जिदें किस लिए बनाई जाती हैं, गिरजाघर किस लिए बनाये जाते हैं ? ताकि हम प्रभु को याद करें। संत दर्शनसिंह जी महाराज ने फ़रमाया है :

**हजार नाम हैं हर नाम से पुकार उसे**

परमात्मा को किसी भी नाम से पुकारा जा सकता है- वाहेगुरु कहें, Lord कहें, अल्लाह कहें, रहीम कहें, करीम कहें, राम कहें। किसी भी नाम से पुकारें लेकिन प्रभु को दिल से पुकारें। जब हम मन्दिरों, मस्जिदों, गुरुद्वारों, गिरजाघरों में जाते हैं, तो हमारा ध्यान प्रभु की ओर होता है। प्रभु को याद करने के लिए ही धर्म स्थान कायम किये जाते हैं। इन स्थानों पर जाना ज़रूरी है क्योंकि आजकल माया का जाल इतना फैला हुआ है कि हम समझते हैं कि हमें फुरसत नहीं है। हर एक इन्सान यही समझता है कि उसे बहुत आवश्यक काम करने हैं। इन्हीं कार्यों में हम लगे रहते हैं और जो हमारा अपना असली काम है, जिसके लिए हम इस दुनिया में आये हैं, उसे भूल जाते हैं। जब हम मन्दिरों, मस्जिदों, गुरुद्वारों और गिरजाघरों में होते हैं, तो हमारा ध्यान थोड़ी देर के लिए दुनिया के कार्यों से हट जाता है, थोड़ी देर के लिए हम परमात्मा की याद में बैठते हैं।

**दुइ कर जोड़ि करउ अरदासि ।**
**तुधु भावै ता आणहि रासि ।।**

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

**बीज संस्कार -**

१. १०० ग्राम बीज को बीजामृत में भिगो दें। और ऊपर से पहले २ ग्राम ट्रायकोडर्मा फफूंदी फिर २ ग्राम अँझोटोबॅक्टर और २ ग्राम पी.एस.बी. जीवाणु संवर्धक का लेप चढ़ाकर जमीन में बुवाई करें। जहाँ बीज बुवाई करनी है वहाँ गोबर की अथवा केंचुवे की खाद जमीन में अवश्य मिलायें। बीज बुवाई के बाद पानी के साथ एक लीटर जीवामृत की सिंचाई करें।

२. पौधे लगाने से पहले २ ली. जीवामृत में ५० ग्राम ट्रायकोडर्मा फफूंदी, २५० ग्राम अँझोटोबॅक्टर और २५० ग्राम पी.एस.बी. जीवाणु संवर्धक मिलाकर पौधों की जड़े १५ मिनट तक डुबोकर रखें फिर पौधे लगायें।

**फसल संरक्षण -** १. पौधे छोटे हैं तब ३% गोमूत्र या ५% नीम अर्क फंवारें।

२. रस चूसनेवाली कीट और इल्लियों के नियंत्रण के लिए ४% गोमूत्र, ५% नीम अर्क या दशपर्णी अर्क में से एक अदली बदली कर छिड़काएँ। ज्यादा दिखाई दें तो ३० ग्राम व्हर्टिसिलीयम पाउडर, ५० मि.ली. दूध, १५ ली. पानी में मिलाकर फंवारें।

### आज्ञा चक्र

३. एक एकड़ खेती में १२-१५ लकड़ियों का एंटीना (T साइज का) बनाकर लगाइये, जिस पर पंछी बैठने से कीट का नियंत्रण होता है।

**(१५) मिर्च की फसल :**

**जमीन को शक्तिशाली बनाने के लिए**

१. प्रति एकड़ ६ टन गोबर की खाद या हरी खाद जमीन में मिलाकर पौधे लगाने के लिए जमीन तैयार करें।

२. पौधे लगाते समय और बाद में प्रति २० दिन के बाद २०० ली. जीवामृत एक एकड़ जमीन में जमीन गीली हो तब छिड़कायें या पानी के साथ छोड़ दें।

३. फल-फूल लगते समय एक एकड़ जमीन के लिए एक टन केंचुवे की खाद और ६० किलो अनाज की खाद और ट्रायकोडर्मा फफूंदी एक किलो, अँझोटोबॅक्टर एक किलो, पी.एस.बी. जीवाणु संवर्धक एक किलो मिलाकर जमीन गीली हो तब एक एकड़ जमीन में मिला दें।

४. नीम की खली (पाउडर) ५० किलो, एक एकड़ में पौधों के ऊपर से जमीन पर छिड़कायें।

३. एक एकड़ खेती में १२-१५ लकड़ियों का एंटीना (T साइज का) बनाकर लगाइये, जिस पर पंछी बैठने से कीट का नियंत्रण होता है।

**(१५) मिर्च की फसल :**

**जमीन को शक्तिशाली बनाने के लिए**

१. प्रति एकड़ ६ टन गोबर की खाद या हरी खाद जमीन में मिलाकर पौधे लगाने के लिए जमीन तैयार करें।

२. पौधे लगाते समय और बाद में प्रति २० दिन के बाद २०० ली. जीवामृत एक एकड़ जमीन में जमीन गीली हो तब छिड़कायें या पानी के साथ छोड़ दें।

३. फल-फूल लगते समय एक एकड़ जमीन के लिए एक टन केंचुवे की खाद और ६० किलो अनाज की खाद और ट्रायकोडर्मा फफूंदी एक किलो, अँझोटोबॅक्टर एक किलो, पी.एस.बी. जीवाणु संवर्धक एक किलो मिलाकर जमीन गीली हो तब एक एकड़ जमीन में मिला दें।

४. नीम की खली (पाउडर) ५० किलो, एक एकड़ में पौधों के ऊपर से जमीन पर छिड़कायें।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मन्या रोज साखरेचा डब्बा पाहतो आणि झोपतो हे बघून बायको विचारते, रोज तुम्ही साखरेचा डब्बा का चेक करता?

मन्या : डॉक्टरांनी मला रोज शुगर चेक करायला सांगितली आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारतीय अंतराळ संस्था आयएसआरओ चे नवीन अध्यक्ष कोण?

- एस. सोमनाथ

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

**उपचार - शारीरिक कारणे :** कष्टार्तवामध्ये प्रथमत: व्याधीची लक्षणे कशामुळे जाणवतात यासाठी काही तपासण्या करून घेणे गरजेचे आहे. यासाठी रक्त व लघवी तपासणी तसेच सोनोग्राफी करून घ्यावी. सोनोग्राफीमध्ये कुठल्या शारीरिक दोषामुळे कष्टार्तव होत आहे याचे निदान होते. जर हार्मोन्स मध्ये असंतुलन असेल तर सुरुवातीला तीन महिने हार्मोनल थेरपी करावी. इस्ट्रोजन + प्रोजेस्टेरोन गोळ्या घेतल्यामुळे बीजनिर्मिती थांबते. त्यामुळे पाळीच्या वेळेस वेदना होत नाहीत. त्यासोबतच अशोकारिष्ट सुरु करावे. जर गर्भाशयाचे मुख अरुंद असेल तर डायलेटेशन करून ते रुंद करून घ्यावे. त्यामुळे मासिक पाळीच्या वेळी रजःस्राव व्यवस्थित होऊन वेदना होत नाहीत. आंतर जननेंद्रियांना जंतुसंसर्ग झाल्यामुळे वेदना होत असतील तर जंतूनाशकचे (ntibiotics) उपचार तज्ज्ञांच्या सल्ल्याने करावेत. कष्टार्तव या व्याधीच्या उपचाराचा विचार करताना शारीरिक उपचारांबरोबरच मानसिक उपचारांनादेखील महत्त्व आहे. त्यामुळे तरुण मुलींना त्यांच्या आईने पाळीबद्दल व्यवस्थित समजावून सांगावे. हा एखादा रोग नाही; तर मासिक पाळी सुरू होणे ही आपल्या आयुष्यातील अतिशय आनंदाची गोष्ट आहे. कारण स्त्रीचे स्त्रीत्व यावरच अवलंबून असते. पाळीमध्ये ओटीपोटात थोड्याफार वेदना होतात. त्याकडे दुर्लक्ष करणे गरजेचे आहे. ही अगदी नैसर्गिक गोष्ट आहे. त्याकरिता 'तू तुझा दैनंदिन अभ्यास, इतर कार्य चालू ठेव. फक्त जास्त मैदानी खेळ खेळू नकोस' अशी माहिती आईने व शिक्षिकेने मुलींना सांगावी. शाळेत या विषयावर तज्ज्ञांचे व्याख्यान ठेवावे.

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**आयुर्वेदिक औषधोपचार -** यामध्ये सकाळ संध्याकाळ दोन-दोन चमचे अशोकारिष्ट, महामंजिष्ठा काढा, ब्राह्मी घृत घ्यावे. स्थानिक स्नेहन, स्वेदन करून निरूह बस्ती द्यावी. निरूह बस्तीसाठी दशमूळ क्काथ किंवा गोमूत्र ५०-१५० मिली या प्रमाणात घ्यावे.

**मात्रा बस्ती :** सहचर तैल, दशमूळ तैल, नारायण तैल यापैकी कुठल्याही एका तैलाचा ५० मिली बस्ती द्यावी. पाळी सुरू होण्याच्या आधी आठ दिवस सहचर तैलाचा पिचु योनीमध्ये ठेवल्यास कष्टार्तवाचा त्रास कमी होतो. जर खूप त्रास होत असेल व रजःस्राव व्यवस्थित होत नसेल, तर शिरेतून २०-३० मिली रक्तमोक्षण करून दूषित रक्त काढल्यावर वेदना लगेच कमी होतात. अशा प्रकारे तज्ज्ञांच्या सल्ल्याने आयुर्वेदिक उपचार करून बघावेत.

**रुग्णानुभव ५ -** नुकतेच लग्न झालेल्या प्रियंकाला तिच्या घरच्यांनी हॉस्पिटलमध्ये उचलून आणले. इतर पेशंटची गर्दी असल्यामुळे परिचारिकेने तिला आंतररुग्ण विभागामध्ये झोपवले. प्रियंका जोरजोरात वेदनेने रडत व ओरडत होती.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



आऊट स्टँडिंग इंजिनियर अवॉर्ड डॉ. शरद मगर यांच्या रुपेश राजहंस यांना प्रदान करण्यात आला.

## नगरच्या श्नाइडर इलेक्ट्रिक कंपनीचे आर अ‍ॅण्ड डी प्रमुख रुपेश राजहंस यांना ‘आउटस्टँडिंग इंजिनिअर २०२५’ पुरस्कार

नगर – श्नाइडर इलेक्ट्रिक कंपनीचे आर अ‍ॅण्ड डी प्रमुख आणि संचालक रुपेश राजहंस यांना आउटस्टँडिंग इंजिनिअर २०२५ हा पुरस्कार इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स इंडिया, अहिल्यानगर स्थानिक केंद्रातर्फे प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम १८ सप्टेंबर रोजी अशोकभाऊ फिरोदिया ऑडिटोरियम, अहिल्यानगर येथे झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार संग्राम जगताप होते. तसेच, गेस्ट ऑफ ऑनर म्हणून शरद मागर व इंजि. काबरा उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी. पी. भगवत (चेअरमन) आणि सचिव डी. ए. विधाते होते.

रुपेश राजहंस यांना त्यांच्या उल्लेखनीय आणि प्रशंसनीय कारकिर्दीसाठी हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी संशोधन, नवोपक्रम, गुणवत्ता आणि विकास क्षेत्रात केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. श्री. राजहंस यांना श्नाइडर इलेक्ट्रिकचे उपाध्यक्ष अरविंद परगावकर यांनी यशाबद्दल अभिनंदन केले आहे. रुपेश राजहंस यांना स्विचगियर उद्योगात ३१ वर्षांचा आर अ‍ॅण्ड डी अनुभव आहे. सध्या ते डायरेक्टर – एमव्हीई आर अ‍ॅण्ड डी, टेक्निकल सपोर्ट एआयएस या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी गुणवत्ता, चाचणी, अनुप्रयोग अभियांत्रिकी, डिझाईन, आर अ‍ॅण्ड डी, टाईप टेस्टिंग आदी क्षेत्रात काम केले आहे. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये १५ हून अधिक तांत्रिक शोधनिबंध सादर केले आहेत आणि ९८ हून अधिक पेटंट्स दाखल केली आहेत. त्यांनी १२० हून अधिक टाईप टेस्ट्स राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळांमध्ये हाताळल्या आहेत.

श्री. राजहंस हे CIGRE, ISDEIV, IEEMA HV यांचे सदस्य आहेत. त्यांनी ३१ वर्षांच्या कारकिर्दीत ४५ हून अधिक उत्पादने विकसित केली आहेत. त्यांचा जन्म व शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथे झाले आहे. सध्या ते ३२ अभियंत्यांच्या टीमचे नेतृत्व करतात.

# सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या सभासदांना पंधरा टक्के लाभांश देण्याची परंपरा यंदाही कायम

### चेअरमन समीर बोरा



सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सिताबन लॉन्स येथे चेअरमन समीर बोरा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

नगर – सहकारमहर्षी सुवालाल गुंदेचा यांनी स्थापन केलेल्या जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेला विश्वसनीय आणि शिस्तबध्द कारभाराची परंपरा आहे. त्यामुळेच स्थापनेपासूनची १५ टक्के लाभांशाची परंपरा यंदाही कायम राखण्यात यश आले आहे. संस्थेला ऑडिट अ वर्गही प्राप्त झाला आहे. संस्थेचे स्वमालकीच्या नूतन प्रशस्त वास्तूत स्थलांतर झाल्यापासून ग्राहक संख्या दुपटीने वाढली आहे. संस्थेची सोने खरेदीसाठी कर्ज योजना चांगलीच लोकप्रिय ठरली आहे. भविष्यात ठेवीवरील व्याजदर वाढविण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले जातील, अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन समीर बोरा यांनी दिली.



सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सभेत उपस्थित सभासद आदी.

सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच सिताबन लॉन्स येथे चेअरमन समीर बोरा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी त्यांनी संस्थेच्या कारभाराचा लेखाजोखा सादर केला. यावेळी व्हाईस चेअरमन अभय पितळे, संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, शैलेश गांधी, चेतन भंडारी, विनित बोरा, अ‍ॅड.आनंद फिरोदिया, शरद गोयल, सुवर्णा डागा, प्रिती बोगावत, विनय भांड, तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे, सी.ए.डॉ. परेश बोरा, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी यांच्यासह सभासद जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष सी.ए.अशोक पितळे व राजेंद्र चोपडा, प्रधान मंत्री शैलेश मुनोत, मर्चंटस बँकेचे व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक सी.ए.आयपी अजय मुथा, संजय बोरा, सी.ए.महेश भळगट, रमेश पितळे, संजय मुनोत, सोनई येथील संजय भळगट, माजी संचालक संजय गुगळे, माजी संचालक राजेंद्र गांधी, सचिन सोनी, माजी संचालक ईश्वर

### वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

भंडारी, मेहूल भंडारी, महेश नागरी पतसंस्थेचे संचालक पवन गुंदेचा, जॉईजचे सचिन डुंगरवाल, नितीन शिंगी, अ‍ॅड. रवींद्र सेलोत, अ‍ॅड. अतुल गुगळे, अ‍ॅड. मनिष गांधी आदींसह सभासद उपस्थित होते. वार्षिक सभेला महिला सभासदांची लक्षणीय उपस्थिती होती.

प्रारंभी सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी यांनी अहवाल वाचन केले.

चेअरमन समीर बोरा पुढे म्हणाले की, संस्थेने सुरक्षित कर्ज वितरण आणि प्रभावी कर्ज वसुलीवर कायम भर दिला आहे. एकूण कर्जापैकी ७० टक्के कर्ज सोने तारण व वेअर हाऊस कर्ज आहे. संस्थेने सर्व नियमांचे काटेकोर पालन करून वेगवेगळ्या को ऑप बँकांमध्ये २५ कोटी १८ लाख रुपयांची गुंतवणूक केली आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी जीएसटी, इन्कम टॅक्स, कोर्टाचे ई स्टॅम्प असा सरकारी भरणाही अत्यल्प शुल्कात संस्थेत करता येतो. मार्केट यार्ड शाखेचे लवकरच नूतनीकरण नियोजित आहे. संस्थेने जलद आणि अचूक व्यवहारासाठी सीबीएस सॉफ्टवेअर कार्यान्वित केले आहे. संस्थेच्या यशस्वी वाटचालीत सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक या सर्वांचाच सिंहाचा वाटा आहे. संस्थेला कार्यक्षम अधिकारी, कर्मचारी लाभल्याने प्रशासकीय कामकाज अतिशय नियोजनबध्द चालते. सर्व संचालकांच्या एकत्रित प्रयत्नातून भविष्यातही संस्थेच्या प्रगतीचा आलेख कायम उंचावत राहिल अशी ग्वाही चेअरमन समीर बोरा यांनी दिली.

खेळीमेळीत पार पडलेल्या वार्षिक सभेत विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना एकमताने मंजुरी देण्यात आली.

व्हाईस चेअरमन अभय पितळे यांनी आभार मानले. मनोज लुणिया यांनी सभेचे सूत्रसंचालन केले. सभेनिमित्त सभादांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. यात महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे एस.एन.साखरे यांनी मार्गदर्शन केले.

# पंजाबी व सिख समाजातर्फे पुणे येथे ५ ऑक्टोबरला वर-वधु परिचय संमेलनाचे आयोजन

नगर – पंजाबी व सिख समाजातर्फे पुणे येथे वर–वधु परिचय संमेलनाचे आयोजन, द पंजाबी क्लचर असोसिएशन, सेलसबरी पार्क, गुलटेकडी, पुणे येथे ५ ऑक्टोबर रोजी होणार आहे. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी संमेलनाचे आयोजन करण्यात येते व अशी माहिती कश्मीरी नागपाल, अरुण चोपडा, हरिष, किशोर कंत्रोड यांनी दिली आहे.

ज्यांना सदर परिचय संमेलनात भाग घ्यायचा त्यांनी आपल्या सोबत वर व वधु आणणे जरुरी आहे. त्या शिवाय त्यांना आत प्रवेश दिला जाणार नाही. अधिक माहितीसाठी पंजाबी क्लचर असोसिएशन, सेलसबरी पार्क, गुलटेकडी, पुणे अरुण चोपडा मो. नं. ९६२३११६१७०, संगिता मल्होत्रा मो.नं. ९९२२४२९७१४, किशोर कंत्रोड (अहिल्यानगर) मो.नं. ८९९९८१२४०८ । ९२२६७८३१०१ हैदराबाद पंजाबी सेवा समिती, उमेश ठकराल ९३४६४३४७८६, ऑफिस – ८१२५७४९९६५. पंजाबी हिन्दू एसोसिएशन जबलपुर होमसाईस कॉलेज रोड, नेपियर टॉउन, जबलपुर ऑफिस नं. ६२६३३०४८००, उमेश खुराना नं. ८०८५९५९८४९, आर के कपुर नं ९१३१५५०७००

सुरत पंजाबी समाज, राधाकृष्ण मंदिर, गेटवे हॉटेल जवळ, पारले पॉईट, ऑफिस – ८१४००५५५८८, नरेश सेठ ९३७७७२२२००, कैलाश छाबडा ९३७४४२१२८०, अमदाबाद पंजाबी बिराद्री, नवरंगपुरा चेरीटेबल ट्रस्ट तर्फे पंजाबी सेवा समाज हॉल, किशोर महेदिरता – ९८२५०३५८२०, ठाकूर खुराना ९७२४६५९६१६, नागपुर सनातन भवन प्रेमनाथ सहानी ९८२२२०४०५७, नरेंद्र सेठिजा ९८९०३३४७४७, विनय ओबराय ९४२३१०३९४३, हेमंत सहानी ९८२३०३२५१२१२९, भोपाल पंजाबी समाज, मोहनसिंग कालारा ७०००४३२६०६, शशि वैद – ९३०३०७९४४६, संजीव सचदेव ९४२५००९६३०, पंजाबी सनातन सभा रायपुर छत्तीसगड ऑफिस –९१११००२०९९, यशपाल कपूर– ९९८१०१३४५६, प्रीतम अरोरा – ९८२६३४९३३५, तिलक कक्कड – ९८२७१८७०८७, इंदोर पंजाबी समाज, बलराज सबलोक – ९६४४४७१०८९, श्वेता खत्री ७३५४६१९९६०, विजय ग्रोवर– ९४२५४८०७०९, नाशिक, किरण कालरा – ९४२२७४६६८५, अशोक ग्रोवर – ९५२७४७२४७९, पंजाबी वेलफेअर फौंडेशन, पुणे पिंपरी – हरिष मदान ९३२५६५९१४२, सुरेंद्र वाधवा ८६००८६६०००, लिना सप्रा ९८६०६०७१२७, व किशोर कंत्रोड – ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१ पुणे कॅम्प गुरुद्वारा, पुणे विक्रम सिंग कांड – ९९२२९३१८८०, उत्तर प्रदेशचे खत्री समाज चे अध्यक्ष आचल महरोत्रा ९५५५४११०९२, सिंकदराबाद गुरुद्वारा साहेब, नियर रेल्वे स्टेशन जवळ सिंकदराबाद – बलदेवसिंग बग्गा ९८४८०४४४४५, हैदराबाद गुरुद्वारा साहेब बहरमबाला सिख छवणी हैदराबाद सुखदेव सिंग– ९९४९६२२५३, अहिल्यानगर किशोर कंत्रोड – ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१, मधुर मिलन मेरेज ब्युरो, (सोशल सर्व्हिस) किशोर प्रोव्हिजन स्टोअर, इंदिरा कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर यांना संपर्क साधा. या कार्यक्रमात नाव देऊन नातलगामध्ये होणाऱ्या कमी करण्यासाठी व ज्यादा शहर न फिरता एक ठिकाणी येऊनी आपल्या जिवनसाथीची योग्य निवड करता यावी व आयोजकांना समाजसेवेची संधी मिळावी. अशी माहिती चंद्रकुमार मुनोत, हरीष मदान, मोहन सिंग कालरा, सुरेंद्र वाधवा, अरुण चोपडा, किशोर महेदिरता, नरेंद्र सेतीजा, प्रेमनाथ सहानी, यशपाल कपूर, तिलक कक्कड, नरेश सेठ, विनित अरोरा, किशोर कंत्रोड, राजेंद्र कंत्रोड, प्रदिप पंजाबी यांच्यावतीने देण्यात येत आहे.



दीक्षित मंगल कार्यालय येथे पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना वसंत लोढा.

# पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात

### ठेवीदार, सभासद, खातेदार यांच्या विश्वासामुळे संसथेची प्रगती – वसंत लोढा

नगर – पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रेरणेने व सर्वांच्या सहकार्याने स्थापन झालेल्या पंडित दीनदयाळ पतसंस्थेची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. संस्थेचा आर्थिक लेखाजोखा आपणा सर्वांसमोर मांडताना मनस्वी आनंद होत आहे. संस्थेचा सर्व कारभार स्वभांडवलावर अत्यंत चोखपणे व पारदर्शीपणे चालू आहे. सर्वसामान्यांची पत समाजात वाढवावी. या उद्देशाने ज्या कर्जदारांना ५० हजार रुपयांचे कर्ज देण्यात आले होते. आज ते कर्जदार दोन ते तीन कोटी कर्ज घेऊन व्यवसाय वृद्धिंगत करीत आहेत. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत आर्थिक सहाय्य कार्य करुन दुर्बल घटकांना न्याय देण्यासाठी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली आहे. संस्थेचे भाग भांडवल हे दोन कोटीचे असून ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेचे वसूल भाग भांडवल एक कोटी दहा लाख ५२ हजार ४०० रुपये झालेले आहे. बाजारात मंदी असताना देखील अहवाल सालात ठेवी मध्ये पाच कोटी १४ लाखांनी वाढ झालेली आहे. ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेकडे एकूण ठेवी ७३ कोटी ६ लाख ५९ हजार रू.झालेल्या आहेत. नेहमीप्रमाणे याही वर्षी संस्थेने १० टक्के लाभांश जाहीर केला आहे. संस्थेच्या आजपर्यंत ऐंशी कोटींपर्यंत ठेवी आहेत. संस्थेने पुढील वर्षी १०० कोटी ठेवींचे उद्दिष्ट पार करण्याचे डोळ्यासमोर ठेवले आहे. दरवर्षी पतसंस्थेच्या माध्यमातून पंडित दीनदयाळ व्याख्यानमालाचे आयोजन करण्यात येते. या व्याख्यानमालेतून समाजप्रबोधनाचे कार्य होत आहे. पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेचे सभासद खातेदार, ठेविदार व हितचिंतक आणि सर्व तत्कालीन व विद्यमान संचालक यांनी दाखविलेल्या विश्वासामुळे संस्था प्रगतीपथावर आहे, असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक, चेअरमन वसंत लोढा यांनी केली आहे.

दीक्षित मंगल कार्यालय येथे पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेचे ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा वसंत लोढा यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली. याप्रसंगी व्हाईस चेअरमन सुधीर पगारिया, मानद सचिव विकास पाथरकर, ज्येष्ठ संचालक मिलिंद गंधे, संचालक शैलेश चंदे, निलेश लोढा, श्रीमती शैला चंगेडे, संचालिका शारदा होशिंग, सुभाष फणसे, बाबासाहेब साठे, व्यवस्थापक निलेश लाटे, उपव्यवस्थापक सुखदेव दरेकर, अ‍ॅड. अच्युत पिंगळे, अशोक कानडे, आर.डी.मंत्री, अनिरुद्ध देवचक्के, अनिल सबलोक, राजेंद्र बलदोटा, बाळासाहेब भुजबळ, सुरेश शिरसागर, संतोष गांधी, सुरज अग्रवाल, शांतीलाल लोढा, विलास नंदी, सीए राजेंद्र काळे, कुलकर्णी ज्ञानेश, किशोर गांधी, यशवंत बापट, सुधीर मुळे, प्रमोद मोहाळे, मुकुल गंधे, उदय अनुभुले, गजेंद्र सोनवणे, सचिन पारखी, प्रशांत मुथा, निखिल नहार आदींसह सभासद, हितचिंतक, ठेवीदार उपस्थित होते.

प्रास्ताविकात विकास पाथरकर म्हणाले, सभासदांच्या भरभक्कम विश्वासामुळे संस्थेची प्रगती होत आहे. पतसंस्थेच्या पारदर्शी कारभारामुळे संस्थेचा शहरात चांगला नावलौकिक आहे. सभासद व वसूल भागभांडवल हे संस्थेचे शक्तिस्थान आहे. भाग भांडवलामध्ये झालेली वाढ ही संस्थेवरील विश्वासाची प्रचिती देते.

वार्षिक सर्वसाधारण सभेत आर.डी. मंत्री, अ‍ॅड. अच्युत पिंगळे, अनिल सबलोक, सुरेश क्षीरसागर, यशवंत बापट यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना संस्थापक चेअरमन वसंत लोढा यांनी समर्पक उत्तरे देत संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे निदर्शनास आणून दिले.

प्रारंभी व्यवस्थापक निलेश लाटे यांनी मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन केले. वसंत लोढा यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. व विषय पत्रिकेवरील विषयांची माहिती दिली. सनदी लेखापाल सीए ज्ञानेश्वर काळे यांनी लेखा परीक्षण केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित दीनदयाळ उपाध्याय व संस्थेचे माजी चेअरमन संचालक कै.सोमनाथ देवळालीकर यांच्या प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ सभासद अ‍ॅड. अच्युत पिंगळे व आर डी मंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शारदा होशिंग यांनी केले. व्हाईस चेअरमन सुधीर पगारिया यांनी आभार मानले.

# फिरोदिया शिवाजीयन्स इंटरस्कूल फुटबॉल स्पर्धेचे पुढील आठवड्यात नगरमध्ये रंगणार अंतिम सामना

### १६ वर्ष वयोगटात आठरे पाटील पब्लिक स्कूलची अंतिम फेरीत धडक



नगर – फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेचे अंतिम सामने पुढील आठवड्यात अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर रंगणार आहेत. २७ सप्टेंबर रोजी सकाळी १६ वर्ष वयोगटात (मुले) झालेल्या उपांत्य फेरीत आठरे पाटील पब्लिक स्कूलने विजय मिळवून अंतिम फेरी गाठली आहे.

या स्पर्धेत अंतिम सामने १२ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द आठरे पाटील स्कूल, १४ वर्ष वयोगटात (मुले) आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द तक्षिला स्कूल, १६ वर्ष वयोगटात (मुले) आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द आठरे पाटील स्कूल व १७ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्यात होणार आहे.

तसेच तिसऱ्या स्थानासाठी १४ व १६ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट स्कूलचे सामने रंगणार आहे.

शनिवारी झालेल्या १६ वर्ष वयोगटात (मुले) आठरे पाटील पब्लिक स्कूल विरुध्द सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट स्कूल यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना पार पडला. अटीतटीच्या रंगलेल्या सामन्यात भानुदास चंद याने २८ व्या मिनिटाला १ गोल करुन आठरे पाटील संघाचा विजय निश्चित केला. तर प्रतिस्पर्धी संघाला शेवट पर्यंत रोखून धरले, त्यांना एकही गोल करु दिला नाही. १–० गोलने आठरे पाटील पब्लिक स्कूलने विजय मिळवून अंतिम फेरी गाठली आहे.

# छावनी परिषद शाळेच्या भाग्यश्री जोशी हिची जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी झाली निवड



भिंगार – तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा नुकत्याच आर्मी पब्लिक स्कुलच्या मैदानावर झाल्या. त्यामध्ये परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा भिंगारची विद्यार्थीनी व भिंगार स्पोर्टस क्लबची खेळाडू कु.भाग्यश्री प्रशांत जोशी हिने १०० मीटर धावणे, ४०० मी. धावणे व लांबऊडी या तीन क्रिडा प्रकारात स्पर्धामध्ये प्रथम क्रमांक मिळवत असून तिचा जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली.

भाग्यश्री जोशी हिला भिंगार स्पोर्टस क्लबचे विठ्ठल काळे व शिक्षक संजय हजारे यांचे मार्गदर्शन लाभले.

तिचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, मनोनित सदस्य वसंत राठोड, कार्या अधिक्षिका स्नेहा पारनाईक, शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष जयदेव हेंद्रे, मुख्याध्यापक संजय शिंदे, शाळा व्यवस्थापनच्या उषाताई जोशी आदींनी अभिनंदन केले आहे.



**अभिनेत्री डॉ. आदिती गोवित्रीकर व पत्रकार अमित त्यागी यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट**

अभिनेत्री व मिसेस वर्ल्ड डॉ. आदिती गोवित्रीकर व पत्रकार अमित त्यागी यांची मुंबई येथे जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकवणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके यांनी भेट घेऊन त्यांना संस्थेच्या कार्याची माहिती देऊन प्रेरक वक्ता बी के शिवानी दिदी यांचे बिंग लव्ह हे पुस्तक भेट दिले व संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय असलेल्या माऊंट अबू येथे भेटीचे निमंत्रण दिले.

# द क्ले प्री-प्रायमरी स्कूलमध्ये नवरात्र उत्सवात; लहानग्यांच्या बहारदार कलासादरीकरणाने प्रेक्षक मंत्रमुग्ध





द क्ले प्री–प्रायमरी स्कूलमध्ये नवरात्र उत्सवात लहानग्यांच्या बहारदार कलासादरीकरणाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. (छाया – योगेश पाथरकर)

नगर – अहिल्यानगर (केडगाव) येथील द क्ले प्री–प्रायमरी स्कूलमध्ये नवरात्र उत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. या वेळी शाळेच्या संचालिका सौ. सुजाता पठारे यांचे मार्गदर्शन, तर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नम्रता भंडारी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

लहानग्या विद्यार्थ्यांनी विविध स्तोत्रे व श्लोकांचे सादरीकरण करून पालकांची मने जिंकली. परंपरेचा वारसा जपत विद्यार्थ्यांनी चे कन्यापूजन करून ‘सरस्वती वंदना’ केली.

आजच्या काळातील मोबाईल व टीव्हीच्या दुष्परिणामांवर आधारित नो मोबाईल फोन, एस टू टॉयज हे नाटक सादर करण्यात आले. या नाटकांमधून मुलांना व समाजाला प्रभावी संदेश देण्यात आला. नाट्यप्रयोगाच्या यशस्वी सादरीकरणासाठी शाळेच्या शिक्षिका सौ. दिपाली पाथरकर यांचे विशेष नाट्य सादरीकरण, व बाकी शिक्षिका तृप्ती लोढा, राधिका कलंबदाने, सजेरी पोळ यांच्या मदतीने नाट्य पार पडले. कार्यक्रमाला माऊली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अभिजित पठारे, उद्योजक सागर भंडारी उपस्थित होते.

सौ. दिपाली पाथरकर यांनी आभार मानले. विशेष म्हणजे, द क्ले प्री–प्रायमरी स्कूल ही सीबीएसई शाळा असून, इंग्रजी शिक्षणाबरोबर सांस्कृतिक वारसा जपत प्रत्येक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडत पालकांची मने जिंकत आहे.




अहिल्यानगर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या वतीने भिंगार अर्बन बँकेस मानाचे दोन पुरस्कार पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जी.एस. महानगर बँकेच्या अध्यक्षा गीतांजली शेळके व बँक असोसिएशनचे अध्यक्ष सत्यन मुंदडा यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी बँकेचे जेष्ठ संचालक नामदेवराव लंगोटे, एकनाथराव जाधव, विष्णू फुलसौंदर, कैलास खरपुडे, श्रीमती तिलोतमा करांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन, मुख्य शाखा भिंगारचे शाखाधिकारी योगेश भगत व वरिष्ठ अधिकारी रविराज पांढरकर आदी.

# जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनतर्फे भिंगार अर्बन बँकेला मिळाले २ मानाचे पुरस्कार

नगर – अहिल्यानगर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन मर्यादित, अहिल्यानगर तर्फे भिंगार अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेला सहकार क्षेत्रातील प्रगतीबद्दल दोन मानाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करून कर्ज वसुली व एनपीए योग्य प्रमाणात राखल्याबद्दल बँकेस BINGS WRD देण्यात आला. तसेच ग्राहकांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोबाईल बँकिंग, क्यूआर कोड व यूपीआय पेमेंट सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल बँकेस BITS WRD प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार वितरण समारंभ पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जी.एस. महानगर बँकेच्या अध्यक्षा गीतांजलीताई शेळके व बँक असोसिएशनचे अध्यक्ष सत्यन मुंदडा यांच्या हस्ते झाला.

पुरस्कार स्वीकारताना बँकेचे जेष्ठ संचालक नामदेवराव लंगोटे, एकनाथराव जाधव, विष्णू फुलसौंदर, कैलास खरपुडे, श्रीमती तिलोतमा करांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन, मुख्य शाखा भिंगारचे शाखाधिकारी योगेश भगत व वरिष्ठ अधिकारी रविराज पांढरकर आदी उपस्थित होते.

या यशाबद्दल चेअरमन अनिलराव झोडगे व व्हा. किसनराव चौधरी यांनी अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

# नेप्ती येथील श्री छत्रपती अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे 'किल्ले शिवनेरी' येथे स्वच्छता अभियानातून श्रमदान



निंबळक – नेप्तीच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत २७ सप्टेंबर रोजी गड किल्ले संवर्धन अंतर्गत आयोजित 'किल्ले शिवनेरी येथे स्वयंसेवक विद्यार्थ्यांची भेट व स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून श्रमदान' हा उपक्रम हाती घेण्यात आला.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी असणारा किल्ला शिवनेरी आजही त्यांच्या पराक्रमाची साक्ष देत तसेच आपला भक्कम व मजबूतपणा टिकुन आहे. सांस्कृतिक आणि ऐतिहासीक महत्व प्राप्त झालेल्या या किल्ल्याविषयी राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाची सखोल आणि प्रत्यक्षरीत्या माहिती मिळावी, असा उद्देश ठेवून राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना शिवनेरी किल्ल्याचा इतिहास जाणून घेण्याची संधी या उपक्रमाच्या माध्यमातून मिळाली, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी केले.

या ऐतिहासिक किल्ल्याच्या भेटी प्रसंगी विद्यार्थ्यांनी प्लास्टिक निर्मूलन, स्वच्छता हीच सेवा अशा घोषणा देत किल्ल्यावरील काही भागात स्वच्छतेच्या माध्यमातून श्रमदान केले. शिवनेरीचा अभूतपूर्व इतिहास या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी जाणून घेत किल्ल्यावरील शिवाई देवी मंदिर, ७ दरवाजे, बदामी टाकी, धान्य कोठार, अश्या विविध ठिकाणांना या उपक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे ५७ स्वयंसेवक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी तसेच ६ शिक्षक सहभागी होते.

क्षेत्रभेटीचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे, प्रा. अमेय कुलकर्णी, प्रा. सनी जगताप, प्रा. स्मिता पवार, प्रा. अश्विनी गुंजाळ, प्रा. दिपाली पवार या सर्वांनी मिळून केले त्याचबरोबर विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटी दरम्यान यांचे मार्गदर्शन लाभले.




रशियातील व्लादिमीर येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय गोल्डन रिंग लोककला महोत्सवात कु. वैष्णवी डेरे हिने नृत्याविष्कार सादर केले.

## कु. वैष्णवी डेरे हिचा रशियामध्ये भरतनाट्यम नृत्याविष्कार

नगर – भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली व रशियाच्या सांस्कृतिक कार्य मंत्रालयाच्या निमंत्रणावरून रशियातील व्लादिमीर येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय गोल्डन रिंग लोककला महोत्सवात मूळ अहिल्यानगरची कु. वैष्णवी डेरे हिच्याबरोबर ११ जणांनी भारताचे प्रतिनिधित्व करीत भरतनाट्यम, लावणी, गोंधळ, भोरताल इत्यादी नृत्य प्रकार सादर केले.

भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिन आर्टचे संचालक प्रा. सारंगधर साठे, डॉ. सौ. देविका बोरठाकूर यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

# कोहिनूर मॉल आयोजित नवरात्र उत्सवाला प्रतिसाद




कोहिनूर मॉल आयोजित नवरात्र उत्सवामध्ये संचालिका श्वेता गांधी यांच्यासमवेत सहभागी झालेल्या महिला.

नगर – भक्ती, कला आणि उत्सवाचा सुंदर संगम कोहिनूर मॉलमध्ये २५ व २६ सप्टेंबर रोजी आयोजित केलेल्या नवरात्र महोत्सवात अनुभवायला मिळाला. नगरकरांनी उत्साहाने सहभाग घेतला. श्रीसूक्त पठण, भोंडला हा पारंपरिक खेळ, नवदुर्गा नृत्याविष्कार या कार्यक्रमांना प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळाला. या महोत्सवाचे खास आकर्षण ठरले चित्रकार अनुराधा ठाकूर यांचे लाईव्ह पेंटिंग. उपस्थित नागरिकांनी या कलाकृतीचे कौतुक केले. हे चित्र आता लिलावासाठी खुले करण्यात आले असून, जमा होणारी संपूर्ण रक्कम अलीकडील अतिवृष्टीत सर्वस्व गमावलेल्या पूरग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी वापरण्यात येणार आहे.

मॉलच्या संचालिका श्वेता गांधी यांनी सांगितले की, नगरकरांचा प्रतिसाद मिळाल्याबद्दल आम्ही मनापासून आभारी आहोत. मॉल नेहमीच सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देतो आणि त्याचबरोबर समाजोपयोगी उपक्रमांतून लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करतो. त्याच बरोबर नगरकरांना आवाहन केले की पूरग्रस्तांच्या डोळ्यातला अश्रू पुसण्यासाठी, त्यांच्या आयुष्यात नवा रंग भरण्यासाठी, जागतिक ख्यातीप्राप्त चित्रकार अनुराधा ठाकूर यांचे लाईव्ह पेंटिंगच्या लिलावात सहभागी व्हा. ५१०० रुपयांच्या सुरुवातीच्या बोलीने सुरू झालेला हा प्रवास दसऱ्याच्या शुभ मुहूर्तापर्यंत सुरू राहील. तुमची प्रत्येक बोली केवळ एका चित्राची किंमत नाही, तर अनेक गरजू कुटुंबांसाठी आशेचा किरण आहे. लिलाव २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत कोहिनूर मॉलमध्ये होणार असून, नगरकरांना या पुण्यकार्याचा भाग बनण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. ह चित्र कोहिनूर मॉलमध्ये दसऱ्यापर्यंत बघण्यासाठी उपलब्ध आहे.

या कार्यक्रमाला प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमासाठी विशाल लाहोटी, करिश्मा जोशी, प्रसाद सुवर्णपाठकी, आश्लेषा पोतदार, अपर्णा थत्ते, कविता भांबरे, उत्कर्षा दगडे याचे सहकार्य लाभले. दिप्ती गुंदेचा यांनी आभार प्रदर्शन केले.

# २९ सप्टेंबर : जागतिक हृदय दिन

## हृदय आरोग्य आणि जीवनशैलीचे सामाजिक प्रतिबिंब

हृदय हे शरीराचा सर्वात महत्त्वाचा अवयव आहे. ते केवळ रक्तपुरवठ्याचे केंद्र नाही, तर आपल्या जीवनाचे प्रतीक आणि आपल्या शारीरिक, मानसिक व सामाजिक स्वास्थ्याचे मूळ आहे. हृदयाच्या कार्यात लक्षणीय बिघाड होणे म्हणजे फक्त वैयक्तिक आरोग्यावर परिणाम होणे नाही, तर त्याचा परिणाम कुटुंब, समाज आणि देशाच्या सामाजिक व आर्थिक जीवनावरही होतो. आजच्या आधुनिक जीवनशैलीत अनियमित आहार, व्यायामाचा अभाव, तणाव, धूम्रपान आणि मद्यपान यामुळे हृदयरोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. या परिस्थितीत हृदय आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे ठरते. जागतिक हृदय दिन, जो दरवर्षी २९ सप्टेंबरला साजरा केला जातो, हा दिवस हृदयरोग प्रतिबंध, जीवनशैलीतील सुधारणा आणि सामाजिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी समर्पित आहे. २०२५ मध्ये हा दिवस Don't Miss a Beat (एकही क्षण चुकवू नका) या थीमसह साजरा केला जात आहे, ज्याचा उद्देश हृदयाचे आरोग्य टिकवणे आणि वेळेवर उपचार घेण्याचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

जागतिक हृदय दिनाची सुरूवात २००० साली वर्ल्ड हार्ट फेडरेशन (WHF) आणि जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांच्या संयुक्त प्रयत्नांनी झाली. या दिवसाच्या माध्यमातून हृदयरोगांविषयी जनजागृती निर्माण करणे, लोकांना हृदयाचे आरोग्य टिकवण्यासाठी आवश्यक जीवनशैली अवलंबण्यास प्रोत्साहित करणे आणि वेळेवर वैद्यकीय तपासण्या करण्याचे महत्त्व सांगणे हे उद्दिष्ट आहे. प्रत्येक वर्षी या दिवसासाठी विशिष्ट थीम निश्चित केली जाते, ज्यातून त्या वर्षीच्या सामाजिक आरोग्य संदेशावर भर दिला जातो.

या वर्षीची थीम Don't Miss a Beat (एकही क्षण चुकवू नका) अत्यंत प्रभावी आणि विचारप्रवर्तक आहे. हृदयरोगामुळे अनेक कुटुंबे आपल्या प्रियजनांना गमावतात, ज्याचा मानसिक, आर्थिक आणि सामाजिक स्तरावर गंभीर परिणाम होतो. या थीमद्वारे लोकांना हृदयाचे लक्षण ओळखण्याचे, नियमित तपासण्या करण्याचे, योग्य आहार व व्यायाम करण्याचे आणि मानसिक ताण कमी करण्याचे संदेश दिले जात आहेत. सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने हृदयरोग प्रतिबंधित केल्यास केवळ वैयक्तिक जीवन सुधारते असे नाही, तर समाजातील कार्यक्षमतेत वाढ होते, आर्थिक स्थैर्य टिकते आणि कुटुंबीयांचे कल्याणही सुनिश्चित होते.

जागतिक स्तरावर हृदयरोग हे मृत्यूचे प्रमुख कारण मानले जाते. दरवर्षी २०.५ दशलक्ष लोक हृदयरोगांमुळे मृत्यूमुखी पडतात, जे जागतिक मृत्यूंच्या तिसऱ्या भागापेक्षा जास्त आहेत. तथापि, योग्य जीवनशैली अवलंबल्यास आणि वेळेवर वैद्यकीय तपासण्या केल्यास सुमारे ८०% हृदयरोग प्रतिबंध करता येऊ शकतात. भारतात हृदयरोगांचा प्रादुर्भाव चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांमध्ये हृदयरोगांचा धोका वाढला असून विशेषतः २५ ते ५० वयोगटातील तरुणांमध्ये या आजाराचे प्रमाण वाढले आहे. यामागे अयोग्य आहार, जंक फूडचा अधिक प्रमाणात वापर, व्यायामाचा अभाव, तणाव आणि धूम्रपान–मद्यपान यांसारखी जीवनशैलीशी संबंधित कारणे आहेत. महिलांमध्ये हृदयरोगाचे प्रमाण कमी असल्याचे जाणवत असले तरी, आधुनिक जीवनशैलीमुळे त्यांच्यातही हृदयरोगांचा धोका वाढला आहे.

हृदयाचे आरोग्य हा फक्त वैयक्तिक प्रश्न नाही, तर तो सामाजिक आरोग्याशी थेट संबंधित आहे. निरोगी व्यक्ती आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी कार्यक्षम असते. हृदयरोगामुळे एखाद्या व्यक्तीचे मानसिक, शारीरिक आणि आर्थिक जीवन प्रभावित होते, ज्यामुळे कुटुंबात तणाव निर्माण होतो, कामाच्या ठिकाणी कार्यक्षमता कमी होते आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हृदयरोग प्रतिबंध म्हणजे सामाजिक स्थैर्य टिकवणे, आरोग्य सेवा वापरण्याचा भार कमी करणे आणि समाजातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा करणे होय.

हृदयाचे आरोग्य टिकवण्यासाठी जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल करणे आवश्यक आहे. त्यामध्ये संतुलित आहार, ज्यामध्ये ताज्या भाज्या, फळे, संपूर्ण धान्ये, कमी साखर आणि कमी फॅट असलेले पदार्थ यांचा समावेश असतो, तो हृदयासाठी उपयुक्त ठरतो. दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम करणे, चालणे, धावणे, योगा किंवा नृत्य यांसारख्या क्रियांचा समावेश करणे, यामुळे हृदयाचे कार्य सुधारते आणि रक्ताभिसरण सुसंगत राहते. तणाव व्यवस्थापनासाठी ध्यान, योगा आणि श्वासोच्छ्वासाचे तंत्र वापरणे फायदेशीर ठरते. धूम्रपान आणि मद्यपान टाळणे हृदयरोग प्रतिबंधासाठी अत्यावश्यक आहे. तसेच, रक्तदाब, कोलेस्ट्रॉल आणि इतर आरोग्य घटकांची नियमित तपासणी करणे गरजेचे आहे. या सर्व उपायांनी व्यक्तीचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्य सुधारते, आणि समाजात आरोग्याची जागरूकता वाढते.

जागतिक हृदय दिनानिमित्त भारतभर विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. वॉकथॉन, हृदय आरोग्य शिबिरे, व्यायाम कार्यशाळा, योगा शिबिरे आणि आरोग्य तपासणी शिबिरे या उपक्रमांमुळे लोकांमध्ये हृदयाचे महत्त्व समजते. वेगवेगळ्या शहरांमध्ये आयोजित वॉकथॉनमध्ये हजारो लोक सहभागी होतात, ज्यात कुटुंब, मित्र आणि विद्यार्थी सहभागी होऊन हृदय आरोग्याबाबत माहिती मिळवतात. वेगवेगळ्या शहरांमध्ये "Green Fit Marathon' आयोजित करून हृदय आरोग्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जातो. या उपक्रमांमुळे समाजात आरोग्याबाबत जागरूकता वाढते, लोकांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडतात आणि सामाजिक सहकार्य दृढ होते.

जागतिक हृदय दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नाही, तर तो हृदयाच्या आरोग्यासाठी जागतिक चळवळ आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर, हा दिवस कुटुंबीय, समाज आणि व्यापक सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी एक संधी आहे. Don't Miss a Beat (एकही क्षण चुकवू नका) या थीमद्वारे लोकांना हृदयाच्या आरोग्याबद्दल जागरूकता, जीवनशैलीत सकारात्मक बदल आणि नियमित आरोग्य तपासणी करण्याची प्रेरणा मिळते. हृदयाचे आरोग्य राखणे म्हणजे केवळ वैयक्तिक कल्याण नाही, तर सामाजिक स्थैर्य आणि समाजातील आर्थिक व भावनिक संतुलन टिकवणे देखील आहे. चला, आपण सर्वजण एकत्र येऊन हृदयरोग प्रतिबंधासाठी प्रयत्न करूया, जेणेकरून आपले आणि आपल्या समाजाचे जीवन निरोगी, आनंदी आणि समृद्ध राहील.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**

(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# आजच्या आधुनिक जीवनशैलीत हृदयविकाराचा वाढता धोका

**जागतिक हृदय दिन विशेष २९ सप्टेंबर**

हृदयरोग ही जगभरात वेगाने वाढणारी आरोग्य समस्या आहे. आपल्या देशात ती शिगेला पोहोचली आहे. एक–दोन दशकांपूर्वीपर्यंत ही समस्या फक्त श्रीमंत वृद्ध लोकांमध्येच आढळते, असे वाटायचे. पण आता हा आजार आपल्या देशात खूप वेगाने पसरला आहे. मुले आणि तरुणही याला बळी पडत आहेत. देशातील सातत्याने वाढणारे प्रदूषण आणि भेसळीमुळे संपूर्ण जीवसृष्टी साठी धोका वाढला आहे आणि माणसाचा आळस, लोभ, निकृष्ट दर्जाचे अन्न, आधुनिक जीवनशैली आणि मानसिक ताण यामुळे मृत्यूच्या स्वरूपात आजारांना आमंत्रण मिळाले आहे. देशात, तरुण हृदयरोगतज्ज्ञ देखील हृदयरोगामुळे आपले प्राण गमावत आहेत. या वर्षी २०२५ च्या जागतिक हृदय दिनाची थीम एकही ठोका चुकवू नका आहे. ही थीम आपल्या हृदयाच्या आरोग्याला गांभीर्याने घेण्याची एक मजबूत आठवण करून देते, हृदयरोगाच्या सुरुवातीच्या चेतावणीच्या लक्षणांबद्दल सक्रिय राहणे आणि तपासणीला उशीर न करणे, निरोगी सवयी स्वीकारणे आणि वेळेवर वैद्यकीय हस्तक्षेप करणे यावर भर देते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, हृदयरोग हे जगभरातील मृत्यूंचे प्रमुख कारण आहेत. २०२२ मध्ये, अंदाजे १.९८ कोटी लोक हृदयरोगाने मरण पावले, जे जागतिक स्तरावरील एकूण मृत्यूंपैकी अंदाजे ३२ टक्के आहे. यापैकी ८५ टक्के मृत्यू हृदयविकार आणि स्ट्रोकमुळे झाले. अमेरिकेत दर ३४ सेकंदाला एका व्यक्तीचा हृदयरोगाने मृत्यू होतो आणि २०२३ मध्ये, हृदयरोगामुळे ९,१९,०३२ मृत्यू झाले, म्हणजेच दर ३ मृत्यूंपैकी १. तंबाखूचा वापर, अस्वास्थ्यकर आहार (मीठ, साखर आणि तेलाचे जास्त प्रमाण) आणि लठ्ठपणा, शारीरिक निष्क्रियता, आक्रमकता, चिडचिड, राग, नैराश्य, चिंता, भेसळ, हानिकारक मद्यपान आणि वायू प्रदूषण यासारख्या वर्तणुकीशी संबंधित आणि पर्यावरणीय जोखीम घटकांवर लक्ष देऊन बहुतेक हृदयरोग टाळता येतात. हृदयरोगाचे लवकरात लवकर निदान करणे महत्वाचे आहे जेणेकरून समुपदेशन आणि औषधोपचाराने व्यवस्थापन सुरू करता येईल.

दिल्लीस्थित आकाश हेल्थकेअरने केलेल्या पाच वर्षांच्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की कोविड–१९ साथीच्या आजारानंतर हृदयरोगाच्या रुग्णांमध्ये दुप्पट वाढ झाली आहे आणि आपत्कालीन रुग्णांमध्ये ६० टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२० ते २०२३ दरम्यान भारतातील रुग्णालयांमधून गोळा केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की हृदयरोगाच्या रुग्णांपैकी ५० टक्के रुग्ण ४० वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत, ही एक अतिशय गंभीर समस्या आहे. गेल्या ४–५ वर्षांत तरुणांमध्ये या आजाराच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. जोखीम घटकांमध्ये उच्च रक्तदाब (२४ टक्के), मधुमेह (१० टक्के) आणि डिस्लिपिडेमिया (३९ टक्के) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, धूम्रपान (३६ टक्के), जास्त मद्यपान (१६ टक्के), अपुरी शारीरिक हालचाल (११ टक्के) आणि खराब आहाराची गुणवत्ता (१२ टक्के); वैयक्तिक आणि कामाशी संबंधित ताण आणि नैराश्य यासारखे मानसिक घटक; आणि जीवनातील घटना (३२ टक्के) ज्यामुळे इंट्राव्हस्कुलर थ्रोम्बोसिसचा धोका वाढतो आणि परिणामी, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी घटना. याव्यतिरिक्त, अनुवांशिक घटक आणि सामाजिक–आर्थिक असमानता परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवतात. तंबाखूशी संबंधित हृदयरोगामुळे जगभरात १.९ दशलक्ष मृत्यू होतात.

गुजरातमधील जामनगर शहरातील प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. गौरव गांधी (४१) यांचे त्यांच्या राहत्या घरी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. अहवालांनुसार, डॉ. गांधी यांनी त्यांच्या कारकिर्दीत १६,००० हून अधिक हृदय शस्त्रक्रिया केल्या होत्या. अलिकडेच, ३९ वर्षीय हृदयरोगतज्ज्ञ डॉ. ग्रॅडलिन रॉय यांचे चेन्नईतील एका रुग्णालयात कामावर असताना अचानक हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. गोव्यात झालेल्या ३२ किमी मॅरेथॉनमधील सहभागी, ३९ वर्षीय दंतचिकित्सक, फिटनेस उत्साही यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. पुनीत राजकुमार, सिद्धार्थ शुक्ला, राजू श्रीवास्तव, गायक केके आणि नुकत्याच निधन झालेल्या ४२ वर्षीय शेफाली जरीवाला यांसारख्या अनेक तंदुरुस्त आणि निरोगी चित्रपट सेलिब्रिटींच्या मृत्यूचे कारण देखील हृदयरोग होते. काही महिन्यांपूर्वी, महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील एका प्रसिद्ध तरुण कुस्तीपटूचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. कर्नाटकमध्ये, एका २८ वर्षीय तरुणाचा क्रिकेट सामन्यातील विजयाचा आनंद साजरा करताना मृत्यू झाला आणि एका २५ वर्षीय वराचा लग्न समारंभात मंगळसूत्र बांधल्यानंतर लगेचच मृत्यू झाला. विविध भागांमध्ये व्यायामादरम्यान तरुणांचा मृत्यू झाल्याच्या घटनाही नोंदवल्या गेल्या आहेत.

आता लहान शाळकरी मुलांनाही हृदयरोगामुळे जीव गमवावा लागल्याच्या बातम्या खूप वाढल्या आहेत. अहवाल दर्शवितात की देशात दरवर्षी १४ वर्षांखालील शेकडो मुले हृदयविकाराच्या झटक्याने किंवा हृदयविकाराने जीव गमावतात. राजस्थानमधील सिकर येथील एका शाळेत ९ वर्षांच्या मुलीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. अलिगडमधील १४ वर्षांच्या मुलाचा शालेय क्रीडा स्पर्धेची तयारी करताना हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वीच, महाराष्ट्रातील कोल्हापूर येथे एक १० वर्षांचा मुलगा त्याच्या घरासमोर खेळत होता, तेव्हा त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागले, तो घरी गेला आणि त्याने त्याच्या आईला पिण्यासाठी पाणी मागितले आणि तो आईच्या कुशीतच मरण पावला. यापूर्वी, महाराष्ट्रातील नाशिकमध्ये ६ वर्षांच्या शाळकरी मुलीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

वायू प्रदूषणामुळे दरवर्षी ७० लाख मृत्यू होतात, ज्यामध्ये इस्केमिक हृदयरोग हे या मृत्यूंचे एक प्रमुख कारण आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा अंदाज आहे की दरवर्षी अंदाजे ४.२ दशलक्ष अकाली मृत्यू बाहेरील वायू प्रदूषणामुळे होतात. वायू प्रदूषण असलेल्या भागात राहणारे लोक; रस्ते, रेल्वे, बंदरे किंवा औद्योगिक क्षेत्रांजवळ राहणारे किंवा काम करणारे लोक, वणव्याच्या धुराच्या संपर्कात येणारे लोक, धूम्रपान न करणारे पण दुसऱ्याने केलेल्या धूम्रपानाच्या धुराच्या संपर्कात येणारी मुले यांचे आरोग्यावर हानिकारक आणि असंख्य परिणाम होतात. दुसऱ्याने केलेल्या धुम्रपानातील धुराच्या संपर्कात आल्याने हृदयरोग आणि स्ट्रोक, फुफ्फुसांचा कर्करोग, अचानक शिशु मृत्यु सिंड्रोम, वारंवार आणि गंभीर दम्याचे झटके आणि इतर गंभीर आरोग्य समस्या उद्भवतात. अनेक अभ्यासांनी वायू प्रदूषण आणि हृदयाच्या आरोग्यामधील स्पष्ट संबंध स्थापित केला आहे. जेव्हा लोक प्रदूषित हवेत श्वास घेतात, तेव्हा सूक्ष्म कण फुफ्फुसांमध्ये खोलवर जाऊ शकतात आणि रक्तप्रवाहात प्रवेश करू शकतात. यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्या उद्भवू शकतात, ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे: वाढलेला रक्तदाब, हृदयाच्या लयीत अडथळा, हृदयविकाराचा धोका वाढणे, एथेरोस्क्लेरोसिस आणि असुरक्षित लोकसंख्येवर परिणाम.

अधिक जागरूकता, चांगली तपासणी आणि जीवनरक्षक उपायांची उपलब्धता वाढवून हृदयरोगामुळे होणाऱ्या अकाली मृत्यूंचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी केले जाऊ शकते. देशातील व्यापक प्रदूषण, भेसळ आणि अस्वच्छता रोखण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली पाहिजेत. जर आधुनिक जीवनशैली आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असेल तर अशी जीवनशैली सोडून देणेच चांगले. संतुलित आहार घेणे हे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. फळे आणि भाज्या, प्रथिने, निरोगी वसा, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचे संतुलन राखा. तुमच्या जीवनशैलीत दररोज ३० मिनिटे व्यायामाचा समावेश करून सुरुवात करा. हृदयाच्या चांगल्या आरोग्यासाठी, शारीरिक हालचाली वाढवण्यासाठी आणि निरोगी वजन राखण्यासाठी कोई भी शारीरिक व्यायाम, हेल्दी छंद महत्त्वाचा आहे. मीठ, साखर आणि तेलाचे सेवन नेहमी कमी करा. दररोज रात्री ७–८ तासांची पुरेशी झोप घ्या. तंबाखू, दारू किंवा इतर कोणतेही व्यसन ताबडतोब सोडून द्या. तुमच्या दैनंदिन दिनचर्येत तणाव कमी करणारे उपक्रम समाविष्ट करा. स्वच्छता पाळा, पर्यावरण सांभाळा. जीवनातील समस्या शहाणपणाने, शांततेने आणि विवेकाने सोडवा, ताण घेऊ नका. व्यस्त वेळातून स्वतःसाठी थोडा वेळ आनंदी क्षण जगा, कधीकधी तुमचे बालपण देखील जगा. जीवनाचा प्रत्येक क्षण आनंदाने सकारात्मकतेने जगा.



**लेखक – डॉ. प्रीतम भी. गेडाम**

# अर्थजगत

## कारखरेदी करतानाचा अर्थविचार

**स** ध्याच्या काळात कार ही चैन न राहता अनेकांसाठी गरज ठरत आहे. तसेच ती लाइफस्टाइल आणि स्टेटसचे प्रतीक म्हणून ओळखली जाते. असे असले तरी अनेक वेळा लोक कार खरेदी करताना आपल्या उत्पन्नाचा विचार करत नाहीत. केवळ प्रवाहाचा भाग म्हणून किंवा प्रतिष्ठेसाठी कार खरेदी करतात. पण यामुळे भविष्यात अडचणी येऊ शकतात. हे टाळण्यासाठी कार घेताना भविष्यात या कारच्या हप्त्याचा, मेंटेनन्सचा आपल्या मासिक बजेटवर आणि बचतीवर किती परिणाम होईल याचे आकलन करून मगच निर्णय घेतला पाहिजे.




सर्वप्रथम एक गोष्ट लक्षात घ्या की, कार ही एक असेट असून तिची किंमत सतत कमी होते आणि तिचा मेंटेनन्स खर्च वेळोवेळी वाढतो. तज्ज्ञांचे मत आहे की, नीट नियोजन न करता कार खरेदी केल्यास बचत आणि गुंतवणूक योजना बिघडू शकतात. प्रश्न असा आहे कीह आपल्या उत्पन्नाच्या तुलनेत कार किती महागडी असावी? ईएमआयचा भार किती असावा?

सर्टिफाइड फाइनान्शियल प्लॅनर तारेश भाटिया सांगतात की, कारशी संबंधित सर्व खर्च म्हणजे ईएमआय, विमा, इंधन, पार्किंग आणि मेंटेनन्स हे मासिक नेट इनकमच्या १५ ते २०टक्क्यांहून अधिक नसावे. उदाहरणार्थ, जर मासिक पगार ₹८०,००० असेल, तर कारवर एकूण खर्च ₹१२,००० ते ₹१६,००० दरम्यान असावा.

त्याचप्रमाणे, घराचे कर्ज, शिक्षण कर्ज किंवा इतर कर्जाचे हप्ते यांचा एकूण भार नेट इनकमच्या ३५ टक्क्यांपेक्षा जास्त जाऊ नये. उदाहरणार्थ, मासिक इनकम ₹१ लाख असेल आणि होम लोनचा हप्ता २५,००० रुपये असेल, तर कारचा ईएमआय १० ते १२ हजारांपेक्षा जास्त नसावा. यापेक्षा जास्त गेल्यास इतर आवश्यक खर्च आणि बचतीवर परिणाम होऊ लागतो.

**ईएमआय रिझर्व्ह का गरजेचा?**

कार लोन ही अनेक वर्षांची जबाबदारी असते. नोकरी बदल, आरोग्य समस्या किंवा आकस्मिक परिस्थितीत आर्थिक अडचण आल्यास ईएमआय चुकण्याचा धोका असतो. यामुळे आपल्याला दंड, क्रेडिट स्कोअरवर परिणाम यांसारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. यापासून बचावासाठी, ज्या खात्यातून ईएमआय कापला जातो, त्या किमान तीन महिन्यांचा ईएमआय रिझर्व फंड ठेवणे आवश्यक आहे. ही

**जाणून घ्या**

सवयमानसिक शांतता देते आणि क्रेडिट स्कोअर व बँकिंग रेकॉर्डही मजबूत करते.

कारची निवड जीवनाच्या गरजांनुसार करावी. शहरातील व्यावसायिकांना फ्युएल एफिशियंसी आणि सहज पार्किंग हे निकष महत्त्वाचे ठरतात; तर कुटुंबांसाठी सुरक्षा आणि जागा यांचा विचार गरजेचा ठरतो.

कारचा बजेट ठरवताना इतर मोठी लक्ष्ये विचारात घ्यावीत. भविष्यात घर खरेदी करायचे असेल किंवा मुलांच्या शिक्षणासाठी पैसे जमवायचे असतील, तर कारवर जास्त खर्च केल्यास हे ध्येय पूर्ण करणे कठीण होऊ शकते.

कार लोनचा व्याजदर साधारणपणे ९ ते १० टक्के असतो. इक्विटी म्युच्युअल फंड्समधून दीर्घकाळात सरासरी १२ ते १४ टक्के रिटर्न मिळू शकते. याचा अर्थ असा की, जर खूप महाग लोन घेतल्यास ईएमआय वाढेल आणि गुंतवणुकीची क्षमता कमी होईल. भाटिया यांचा सल्ला आहे की, ईएमआय मर्यादित ठेवा, जेणेकरून एसआयपी आणि इतर गुंतवणूक योजना सुरू राहतील.

कार ही डिप्रिसिएटिंग असेट आहे. नव्या कारची किंमत पहिल्या वर्षात १५ ते २० टक्के आणि पाच वर्षांत जवळजवळ अर्धी होऊन जाते. मेंटेनन्स खर्च दरवर्षी वाढतो. जर आधीच रिप्लेसमेंट किंवा मेंटेनन्स फंड ठेवला असेल, तर भविष्यात कार बदलताना नवीन महाग लोन घेण्याची गरज कमी होते.

लग्झरी किंवा हाय-एंड कारची इच्छा नैसर्गिक आहे, पण त्याआधी वित्तीय आधार मजबूत असणे गरजेचे आहे. म्हणजे इमर्जन्सी फंड, तीन ईएमआय रिझर्व फंड आणि एकूण लोन नेट इनकमच्या ३५% पेक्षा जास्त नसावे. कार बजेटच्या बाहेर असेल, तर मोठे डाउनपेमेंट करा.




## होम लोन प्राव्हिजनल सर्टिफिकेट का गरजेचे?

**हो** म लोन हा अनेकांसाठी घर खरेदी करण्याचा किंवा स्वप्नातील घर मिळवण्याचा हक्काचा मार्ग असतो. या कर्जाचे व्यवस्थापन फक्त रक्कमेची परतफेड करणे एवढ्यापुरते नाही; तर त्यासोबत कर लाभांचा विचार करणेही आवश्यक असते. यासाठी होम लोन प्राव्हिजनल सर्टिफिकेट हा कर्जदारासाठी अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज ठरतो. हे सर्टिफिकेट कर्जदाराला सध्याच्या होम लोनच्या प्रमुख रक्कम आणि व्याज परतफेडीची माहिती सादर करते, ज्यामुळे कर भरण्याच्या प्रक्रियेत आणि कर सवलती मिळवण्यात मोठी मदत होते.

मिळवण्यासाठी आवश्यक ठरते. कर्मचारी किंवा गृहकर्ज घेणारा कर्जदार आपल्या नियोक्त्याला अंदाजे व्याज व प्रमुख परतफेडीची माहिती पुरवतो, ज्यामुळे त्याचा टीडीएस योग्यरित्या आकारला जातो. तसेच, या माहितीच्या आधारे कर्जदार आपल्या होम लोनवर मिळणाऱ्या कर सवलतींचा अंदाज करून सेक्शन ८०सी, सेक्शन २४, सेक्शन ८०ईईए आणि इतर संबंधित कलमांतर्गत लाभ घेऊ शकतो. सध्या भारतातील बँका आणि वित्तीय संस्था प्राव्हिजनल सर्टिफिकेट ऑनलाईन बँकिंग, ईमेल, ग्राहक सेवा केंद्र किंवा शाखेत जाऊन

*एकूणच सांगायचे झाल्यास, होम लोन प्राव्हिजनल सर्टिफिकेट हे कर्जदारासाठी आवश्यक आणि उपयोगी साधन आहे. यामुळे कर्जाचे व्यवस्थापन, कर लाभ मिळवणे आणि आर्थिक नियोजन सुलभ होते. गृहकर्ज घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस हा दस्तऐवज वेळेवर मिळवणे आणि त्याचा योग्य वापर करणे गरजेचे आहे, कारण यावरूनच त्याचे कर लाभ सुरक्षित राहतात आणि आर्थिक व्यवहार अधिक स्पष्ट होतात.*

हे सर्टिफिकेट आर्थिक वर्षाच्या सुरूवातीस बँकेकडून कर्जदाराला दिले जाते. त्यामध्ये त्या वर्षासाठी अंदाजे किती व्याज आणि प्रमुख रक्कमेची परतफेड करावी लागेल, याचे तपशीलवार गणित दर्शवले जाते. या गणनेत कर्जाच्या अटी आणि सध्याच्या व्याजदरांचा समावेश असतो. प्राव्हिजनल सर्टिफिकेटमध्ये सध्याचे कर्ज शिल्लक, अंदाजे वार्षिक व्याज व प्रमुख रक्कमेची परतफेड, तसेच आर्थिक वर्षाच्या शेवटी अपेक्षित कर्ज शिल्लक याची माहिती असते. तसेच, सध्याच्या ईएमआय रकमेचा तपशील आणि आतापर्यंत केलेल्या परतफेडीची माहिती यात समाविष्ट असतो.

हे सर्टिफिकेट विशेषतः कर लाभ कर्जदाराला उपलब्ध करतात. संयुक्त गृहकर्जासाठी, हे सर्टिफिकेट प्रत्येक मालकाच्या मालकीच्या टक्केवारीनुसार स्वतंत्र माहिती दर्शवते, ज्यामुळे प्रत्येक कर्जदार आपला कर लाभ योग्यरित्या प्राप्त करू शकतो. हा दस्तऐवज फक्त कर लाभासाठी नाही, तर आर्थिक नियोजनासाठीही उपयुक्त आहे. होम लोनची सध्याची शिल्लक, अपेक्षित वर्षअखेरची शिल्लक, व्याज व ईएमआय तपशील पाहून कर्जदार आपल्या मासिक बजेटची योग्य मोजणी करू शकतो. तसेच, भविष्यातील कर्ज परतफेडीची योजना आखताना हा सर्टिफिकेट मार्गदर्शक ठरतो.

## जीएसटी सुधारणांचे लाभ गृहखरेदीदारांना कधी मिळणार?

**अ** लीकडेच देशात नवीन वस्तू व सेवा कर प्रणाली लागू करण्यात आली. यामुळे चारचाकी, दुचाकींसह अनेक वस्तूंच्या भावांमध्ये मोठी कपात झाली असली तरी घरांच्या किमतींमध्ये सवलत मिळण्यास अद्याप काही काळ जावा लागणार खरे फायदे गृहखरेदीदारांपर्यंत पोहोचण्यासाठी काही महिने लागू शकतात. काय आहेत याची कारणे?

केंद्र सरकारने वस्तू व सेवा कर संरचनेत बदल करून कर आकारणी सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. याचा उद्देश विविध क्षेत्रातील खर्च कमी करून सामान्य जनतेस फायदा पोहोचवणे आहे. पण रिअल इस्टेट हे अजूनही गुंतागुंतीचे क्षेत्र आहे.

कोणत्याही गृहनिर्माण प्रकल्पाची सुमारे अर्धी किंमत जमीन खरेदीवर खर्च होते, जी वस्तू व सेवा कराच्या बाहेर येते. उरलेली बांधकामाची किंमत विविध करदरांवर अवलंबून असते. जसे की सिमेंट, स्टील, टाईल्स आणि इतर बांधकाम साहित्य. त्यामुळे नवीन प्रणालीचा प्रभाव लगेच जाणवणे सोपे नाही.

मुळात, गृहनिर्माणामध्ये किंमत निर्धारण सोपे नाही. नवीन कर संरचनेत इनपुट खर्च कुठे आहे हे समजून घेण्यासाठी डेव्हलपर्सना वेळ लागेल. यानंतरच ठरवले जाईल की फायदा खरीदारांपर्यंत कितपत आणि कसा पोहोचवायचा.

विकसक नवीन नियमांनुसार प्रकल्पाचा बजेट आणि कर देण्याच्या जबाबदाऱ्या पुन्हा मोजणी करत आहेत. यात इनपुट कर क्रेडिट आणि बदललेल्या दरांचा एकूण खर्चावर होणारा परिणाम तपासला जातो.



**तज्ज्ञांचे म्हणणे आहे की घरांच्या किमतींमध्ये वास्तविक घट आणणे विकसकांच्याच हातात आहे. त्यांना नवीन कर समायोजन वेगाने आणि कुशलतेने राबवावे लागेल. तसेच हा फायदा स्वतः ठेवायचा की ग्राहकांपर्यंत पोहोचवायचा हे ठरवावे लागेल.डेवलपर्ससाठी इनपुट खर्च कमी होऊ शकतो. पण खरेदीदारांपर्यंत फायदा पोहोचण्यास काही वेळ लागू शकतो. सणांच्या काळात विकसक मर्यादित कालावधीच्या ऑफर देऊ शकतात. पण जीएसटी बदलामुळे घर खरेदी स्वस्त होईल की नाही, हे सांगणे सध्या कठीण आहे.**



## डिव्हिडंड आणि ग्रोथ फंडमध्ये काय फरक आहे?

**म्यु** च्युअल फंडमध्ये गुंतवणूक करताना अनेक वेळा गुंतवणूकदारांसमोर दोन पर्याय येतात - ग्रोथ ऑप्शन आणि डिव्हिडंड ऑप्शन, ज्याला आता इनकम डिस्ट्रीब्युशन कम कॅपिटल विड्रॉल (आयडीसीडब्ल्यू) असे म्हणतात. या दोन पर्यायांची काम करण्याची पद्धत वेगळी आहे आणि त्यांचा तुमच्या गुंतवणुकीवर आणि नफ्यावर भिन्न परिणाम होतो.

**ग्रोथ ऑप्शन फंड**

यामध्ये म्युच्युअल फंडातून मिळालेला नफा फंडामध्येच पुन्हा गुंतवला जातो. यामुळे तुमच्या मूळ रकमेवर कंपाउंडिंगचा फायदा मिळतो आणि फंडाची नेट एसेट व्हॅल्यू (एनएव्ही) वेळोवेळी वाढते.

निवृत्तीची योजना, मुलांच्या शिक्षणासाठी बचत किंवा भविष्यातील मोठ्या खर्चासाठी बचत यांसारख्या दीर्घकालीन मुदतीसाठी पैसे वाढवायचे आहेत त्या गुंतवणूकदारांसाठी हा पर्याय योग्य आहे. .

ग्रोथ ऑप्शन फंडमध्ये तुम्हाला नियमित नफा मिळत नाही, पण वेळोवेळी तुमची गुंतवणूक मोठी होते. यामध्ये तुम्ही युनिट्स विकता, तेव्हाच कर लागू होतो.

डिव्हिडंड ऑप्शन फंड वेळोवेळी तुमच्या नफ्याचा काही भाग थेट तुमच्या खात्यात देतो. मात्र हे निश्चित रकमेत दिले जात नाही. यामुळे फंडाची एनएव्ही थोडी कमी होते. कारण काही रक्कम तुमच्याकडे जाते. ज्यांना नियमित उत्पन्नाची आवश्यकता आहे, जसे निवृत्तीच्या काळात किंवा महिन्याच्या खर्चासाठी त्या लोकांसाठी हा पर्याय योग्य आहे. डिव्हिडंड आयकरानुसार सामान्य उत्पन्न मानला जातो. दोन्ही पर्यायांमध्ये बाजारातील चढउताराचा परिणाम होतो, पण ग्रोथमध्ये पुन्हा गुंतवणुकीमुळे फायदा अधिक वाढू शकतो.

## मागणीची गाडी सुसाट

**भा** रतातील उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जीएसटी परिषदेने विविध वस्तूच्या जीएसटीत बरीच कपात जाहीर केली आहे. दरम्यानच्या काळामध्ये ई-कॉमर्स कंपन्यांनी आपले सेल सुरू केले आहेत. याला २३ ते २५ टक्के जास्त प्रतिसाद मिळत असल्याचेही कॉमर्स कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी नमूद केले. मोठ्या आकाराचे टीव्ही, फॅशन वस्तू, फर्निचर इत्यादीसाठी ग्राहकांकडून जास्त मागणी येत असल्याचे सांगण्यात आले. मुळात वर्षाच्या या कालावधीमध्ये कंपन्या आणि ई-कॉमर्स कंपन्या विविध वस्तूवर बरीच सूट जाहीर करत असतात. त्यातच जीएसटी कपात झाली आहे. अशा कारणामुळे मागणीत जास्तच वाढ होत असल्याचे बाजार संशोधन करणाऱ्या रेडशिर कंपनीने म्हटले आहे.

मोठ्या आकाराच्या टीव्हीवरील जीएसटी २८ टक्क्यावरून १८ टक्के इतका करण्यात आला आहे. त्यामुळे या वस्तूंच्या किमती सहा ते आठ टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. तर कपडे आणि इतर वस्तूवरील जीएसटी केवळ पाच टक्के इतका करण्यात आलेला आहे. त्यामुळे कपड्याच्या मागणीतही वाढ झाली आहे. फर्निचरवरील जीएसटी ही कमी करून पाच टक्के करण्यात आला आहे. त्यामुळे फर्निचरची मागणी वाढत आहे.





विक्री सुरू झाल्यापासून पहिल्या दोन दिवसांमध्ये या वस्तूंच्या विक्रीत २३ ते २५ टक्के वाढ झाली असल्याचे सांगितले जाते. उत्सवाचे वातावरण असतानाच या वस्तूच्या किमती कमी झाल्यामुळे ग्राहक सुखावले आहेत असे समजले जाते.

सुरुवातीच्या काळामध्ये मागणीचा इतका जोर होता की काही ई-कॉमर्स कंपन्यांच्या ॲपवर जास्त ट्रॅफिक मुळे परिणाम झाला असल्याचे सांगितले जाते. ॲमेझॉन कंपनीने सांगितले की, पहिल्या दोन दिवसांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत आमच्याकडे जास्त ग्राहकांची मागणी नोंदले गेली. या दोन दिवसात ३८ कोटी ग्राहकांनी वेबसाईटला भेट दिली.

शक्यतो ई-कॉमर्समध्ये मेट्रो शहरातून जास्त मागणी असते. मात्र यावेळी छोट्या शहरातूनही जास्त मागणी आली आहे. ॲमेझॉन कंपनीने सांगितले की पहिल्या दोन दिवसात आमच्याकडे ३८ कोटी ग्राहकांनी विचारणा केली. त्यातील ७० टक्के ग्राहक हे छोट्या शहरातील आहेत. आगामी काळात उत्सवाचे वातावरण आणखी वाढणार आहे. त्यामुळे या मागणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. स्नॅपडील, फ्लिपकार्ट या कंपन्यांनी असेच निरीक्षण नोंदविले आहे.



## आरोग्य विमा आणि दुर्मिळ आजार



**आ** रोग्यव्याधींमुळे होणाऱ्या आपत्कालीन खर्चाच्या काळात आर्थिक आधार मिळावा या उद्देशाने हेल्थ इन्शुरन्स म्हणजेच आरोग्यविमा घेतला जातो. पण अनेकांना या विम्यामध्ये कोणकोणत्या आजारांना कव्हरेज मिळते हेच माहीत नसते. विशेषतः दुर्मिळ आजारांबाबत तर अनेकांना कसलीच कल्पना नसते.

दुर्मिळ आजार हे नावाप्रमाणेच दुर्मिळ असतात. ते फक्त अत्यल्प लोकसंख्येला प्रभावित करतात. जागतिक आरोग्य संघटनेने दुर्मिळ आजारांची व्याख्या करताना '१००० लोकांपैकी एक किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेले आजार ' अशी केली आहे; तर 'ऑर्गनायझेशन फॉर रेअर डिसीजेस इंडिया' ने ही व्याख्या ५,००० लोकांपैकी एक किंवा त्यापेक्षा कमी प्रमाणात होणारे आजार अशी केली आहे. भारतातील आरोग्य विमा मुख्यतः रुग्णालयीन उपचारावर लक्ष केंद्रित करतो, त्यामुळे दुर्मिळ आजारांमध्ये आवश्यक असणाऱ्या दीर्घकालीन साहाय्यक उपचार किंवा देखभाल कव्हर करत नाही. फक्त रुग्णालयीन उपचाराची आवश्यकता असल्यासच विम्याचा लाभ मिळतो.

सध्या भारतातील विमा बाजारात अशा दुर्मिळ आजारांना विशेष लक्ष देणारी धोरणे उपलब्ध नाहीत. कारण या आजारांचे प्रमाण फारच कमी आहे. उदाहरणार्थ, डीएमडी या आजाराचे जागतिक प्रमाण १००,००० लोकांपैकी ४.८ इतके आहे. त्यामुळे अशा धोरणांची निर्मिती आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, कारण दीर्घकालीन उपचारात अपेक्षित दावे जास्त असू शकतात आणि विमा कंपन्यांना नुकसान होऊ शकते. या पार्श्वभूमीवर आपण आरोग्य विमा घेताना काही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. कारण विमा कव्हरेजची पातळी एका विमा कंपनीपासून दुसऱ्या कंपनीपर्यंत वेगळी असते. त्यामुळे पॉलिसी तपासणे आवश्यक आहे. काही दुर्मिळ आजार कव्हर केले जातात, परंतु बऱ्याच कंपन्यांकडे विशिष्ट अपवाद किंवा प्रतीक्षाकाळ असतो. निदानापूर्वी आरोग्य विमा घेण्यास सुरवात केली, तर कव्हरेज मिळण्याची शक्यता वाढते. तसेच पॉलिसी नियमित नूतनीकरण करत राहणे गरजेचे आहे, जेणेकरून संरक्षण सतत राहील.

आरोग्य विम्यात मर्यादा असल्यामुळे सरकारच्या योजना शोधणे आवश्यक आहे. राष्ट्रीय दुर्मिळ आजार धोरणाअंतर्गत निवडल्या गेलेल्या एक्सीलन्स सेंटर्समध्ये रूग्णांसाठी ५० लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य उपलब्ध आहे.

दुर्मिळ आजारांचे उपचार महागडे असतात. त्यामुळे स्वतःचा आरोग्य निधी किंवा बचत ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून आवश्यक तेव्हा खर्चासाठी निधी उपलब्ध राहील. दुर्मिळ आजारांशी निगडीत आरोग्य विमा आणि सरकारी उपाययोजना यांचे योग्य संयोजन केल्यास, रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक संरक्षण आणि उपचाराची सोय उपलब्ध होऊ शकते.

## आयटीआरची अंतिम तारीख चुकली?

**स** रकारने करदात्यांना ॲसेसमेंट इयर २०२५-२६ साठी इनकम टॅक्स रिटर्न (आयटीआर) दाखल करण्यासाठी एक अतिरिक्त दिवस दिला होता, ज्यामुळे अंतिम तारीख १५ सप्टेंबरऐवजी १६ सप्टेंबर २०२५ केली गेली. ज्यांनी ही वाढवलेली मुदतही चुकवली आहे त्यांच्याकडे अजूनही आपले रिटर्न दाखल करण्याची संधी आहे.

ज्यांना इनकम टॅक्स ऑडिटची गरज नव्हती त्यांच्यासाठी १६ सप्टेंबर ही आयटीआर दाखल करण्याची शेवटची तारीख होती. या तारखेनंतर दाखल केलेला रिटर्न बिलेटेड रिटर्न म्हणून ओळखला जातो.

बिलेटेड आयटीआर ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत दाखल करता येतात, ज्यामुळे करदात्यांना कायद्याचे पालन करण्यासाठी आणखी एक विंडो मिळते. मात्र, काही दंड आणि निर्बंध लागू होतात.

**बिलेटेड रिटर्न समजून घेणे**

मूळ अंतिम तारखेनंतर दाखल केलेले कोणतेही आयटीआर म्हणजे बिलेटेड रिटर्न. इनकम टॅक्स नियमांनुसार करदाते ॲसेसमेंट इयर संपण्यापूर्वी तीन महिने किंवा ॲसेसमेंट पूर्ण होण्यापूर्वी (जे आधी येईल) बिलेटेड रिटर्न दाखल करू शकतात. चालू आर्थिक वर्षासाठी याचा अर्थ ३१ डिसेंबर २०२५ ही अंतिम मर्यादा आहे.




**उशिरा दाखल करण्याचे परिणाम**

मूळ अंतिम तारीख चुकवल्याने काही परिणाम होतात. सेक्शन २३४एफ अंतर्गत उशिरा दाखल केल्यास दंड लावला जाऊ शकतो. ज्यांचे उत्पन्न ₹५ लाखांपर्यंत आहे त्यांना ₹१,००० दंड. ज्यांचे उत्पन्न ₹५ लाखांपेक्षा जास्त आहे त्यांना ₹५,००० दंड.

उशिरा दाखल केल्यास परतावा (रिफंड) उशिरा मिळू शकतो, इनकम टॅक्स डिपार्टमेंटकडून जास्त तपासणी होऊ शकते आणि कर थकबाकी किंवा ॲडव्हान्स टॅक्स शॉर्टफॉलच्या स्वरूपावर अवलंबून व्याजही आकारले जाऊ शकते. काही नुकसान (जसे की अनॲब्सॉर्ब्ड डेप्रिसिएशन किंवा हाऊस प्रॉपर्टी लॉस) बिलेटेड रिटर्न दाखल करूनही पुढे नेता येते, पण इतर कॅरी-फॉरवर्ड फायदे गमावले जाऊ शकतात.

ज्यांना जुनी कर पद्धत निवडायची आहे त्यांच्यासाठी १६ सप्टेंबरची अंतिम तारीख चुकवल्याने कपातींवर परिणाम होऊ शकतो. हाऊस रेंट अलाऊन्स (एचआरए), होम लोन प्रिन्सिपल व व्याज सेक्शन ८०उ अंतर्गत किंवा लीव्ह ट्रॅव्हल अलाऊन्स (एलटीए) यासारखे फायदे मिळवण्यासाठी आयटीआर अंतिम तारखेपूर्वी दाखल करणे आवश्यक आहे. बिलेटेड रिटर्न म्हणून उशिरा दाखल केल्याने या कपाती गमावल्या जाऊ शकतात आणि त्यामुळे जास्त प्रभावी कर देयक (टॅक्स लायबिलिटी) येऊ शकते.

म्हणून, जर तुम्ही १६ सप्टेंबरची अंतिम तारीख चुकवली असेल, तर तुमचा आयटीआर शक्य तितक्या लवकर दाखल करा. ३१ डिसेंबरपूर्वी बिलेटेड रिटर्न दाखल केल्यास तुम्ही नियमपालनात राहाल, जरी छोटासा दंड लागू शकतो.




पावसामुळे सीना नदीला पूर आला असून, नदीलगतच्या नागरी वसाहतीतील नागरिकांशी संवाद सधताना आ. संग्राम जगताप. समवेत आयुक्त यशवंत डांगे. शेजारील छायाचित्रात पुराच्या पाण्यात महापालिकेच्या अग्निशामक दलाच्या पथकाने रेस्क्यू ऑपरेशन राबवून नागरिकांना बोटीच्या सहाय्याने सुरक्षितस्थळी हलवले.

# पुराच्या पाण्यात महापालिकेच्या अग्निशामक दलाच्या पथकाचे रेस्क्यू ऑपरेशन, कल्याण रोड परिसरातील नागरिकांना बोटीच्या सहाय्याने सुरक्षितस्थळी हलवले

नगर – मुसळधार पावसामुळे सीना नदीला पूर आला असून, नदीलगतच्या परिसरात नागरी वसाहती, घरांमध्ये पाणी शिरले आहे. महानगरपालिकेच्या अग्निशामक दलाच्या पथकाने नेप्ती नाका, कल्याण रोड परिसरात रेस्क्यू ऑपरेशन राबवून बोटीच्या सहाय्याने सुमारे ३५ ते ४० नागरिकांना पुराच्या पाण्यातून सुखरूप बाहेर काढले. आपत्कालीन परिस्थितीत मनपाची यंत्रणा सज्ञ असून, नागरिकांनी संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

आमदार संग्राम जगताप, यशवंत डांगे यांनी शहरातील परिस्थितीची पाहणी केली. स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्यासमवेत गोरे वस्ती, डॉन बॉस्को, ठाणगे मळा, दातरंगे मळा, नेप्ती नाका व सावेडी परिसराची पाहणी केली. तेथील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांना धीर देण्यात आला. तसेच महापालिका प्रशासनाकडून तातडीने मदतकार्य सुरू करण्याचे आदेश आमदार संग्राम जगताप यांनी दिले. प्रभाग क्रमांक ८ मधील गोरे वस्ती, गणेश चौक, पितळे कॉलनी व संभाजीनगर भागात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर घरात शिरले आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघावा, यासाठी आंबेडकर चौक ते सीना नदीपर्यंत ९०० एमएम व्यासाची गटार योजना लवकरच मार्गी लागेल, असेही आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

आ. संग्राम जगताप म्हणाले, सीना नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यासाठी मी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. कामालादेखील सुरुवात झाली होती. मात्र काही धनदांडग्या लोकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून स्थगिती मिळवली. आजच्या परिस्थितीत महापालिकेने पूरस्थितीची सविस्तर माहिती सर्वोच्च न्यायालयात सादर करून नदीपात्रातील अतिक्रमणे हटविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले, बाळाजी बुआ विहिरीमागे ठाणगे मळा, कवडे नगरजवळ पुराच्या पाण्याने घरात अडकलेले नागरिक, तसेच महानगरपालिका संपवेल येथील कामावरील कर्मचारी, लहान मुली, वयोवृद्ध व्यक्तींना बोटीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले. अनेक वसाहतीमध्ये पाणी शिरले असून या भागात सक्शन मशीन, गाड्यांद्वारे पाणी काढण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. गणेश चौक, बोल्हेगाव, केडगाव परिसर, रेल्वे स्टेशन परिसर या ठिकाणीही महापालिकेच्या यंत्रणेकडून उपाययोजना सुरू आहेत.

हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा दिलेला आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेची यंत्रणा नागरिकांच्या मदतीसाठी सज्ञ आहे. नागरिकांनी मदतीसाठी महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी किंवा आपत्ती व्यवस्थापन कक्षात विभागप्रमुख शंकर मिसाळ मोबाईल नंबर ९५६१००४६३७ यांच्याशी संपर्क साधावा, तसेच, ९१७५६७५२३२ यावर व्हॉट्स अ‍ॅपद्वारे फोटो, व्हिडिओ अथवा लिखित स्वरूपात आपली समस्या पाठवा, असे आवाहन प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

# सीना नदी पुलाच्या अर्धवट आणि चुकीच्या कामामुळे पावसाचे पाणी नागरिकांच्या घरात : खा. निलेश लंके

## ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांकडून नुकसान भरपाई वसुल करावी

नगर – नगर-कल्याण रोडवरील सीना नदीवरील पुलाच्या अर्धवट कामाचा फटका परिसरातील वसाहतींना बसत आहे. पुलाच्या मोठ्या भिंतीमुळे पाण्याचा निचरा होत नसून पुराचे पाणी नागरिकांच्या घरात शिरुन मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्याच्या शेतात पाणी घुसुन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी व नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. या गंभीर प्रकाराला सर्वस्वी संबंधित अधिकारी व ठेकेदार जबाबदार असून नागरिकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई संबंधितांकडून वसूल करावी अशी मागणी खा.निलेश लंके यांनी केली आहे.



नगर-कल्याण रोडवरील सीना नदीवरील पुलाच्या कामाची पाहणी करताना खा.निलेश लंके. समवेत माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक योगीराज गाडे, दत्ता जाधव, विक्रम राठोड, ओम काळे, राहुल घोरपडे, अभिषेक जगताप, चैतन्य ससे यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी.

नगर-कल्याण रोडवरील सीना नदीवरील पुलाच्या कामाची खा.निलेश लंके यांनी २९ सप्टेंबर रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक योगीराज गाडे, दत्ता जाधव, विक्रम राठोड, ओम काळे, राहुल घोरपडे, अभिषेक जगताप, चैतन्य ससे यांच्यासह राष्ट्रीय महागार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, ठेकेदाराचे प्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. खा.लंके यांनी पुलाच्या अर्धवट व चुकीच्या कामाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करीत अधिकारी व ठेकेदार प्रतिनिधीला धारेवर धरले. तसेच काम योग्य पध्दतीने होण्याच्या दृष्टीने सूचना केल्या.

याबाबत खा.लंके यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांना पत्र दिले आहे. सीना नदीवरील पुलाचे काम २१ महिने झाले तरी पूर्ण झालेले नाही. कामाची मुदतही संपून गेलेली आहे. जुन्या पुलाची स्थिती धोकादायक असून अपघातांची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे. नव्या पुलाचे काम ठप्प असल्याने येथे वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. रूग्णवाहिका, शालेय बसेस, माल वाहतूक वाहने यांना मोठा अडथळा निर्माण होत आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

सध्या सुरु असलेल्या सततच्या पावसामुळे जुन्या पुलावर पाणी भरून नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे.याची सर्वस्वी जबाबदार संबंधित जबाबदारी व ठेकेदार एजन्सी हेच आहेत. तरी सदर कामाबाबत संबंधित एजन्सी व अधिकारी यांच्याकडून सविस्तर अहवाल तसेच काम मुदतीत पूर्ण का झाले नाही याबाबतचा अहवाल सादर करावा सदर विषय तातडीने मार्गी न लावल्यास हा विषय संसदेत उपस्थित करून उच्चस्तरीय चौकशी व जबाबदारांवर कारवाई निश्चित करण्याची मागणी करण्यात येईल असा इशारा खा.लंके यांनी दिला आहे.

# नगर तालुक्यात बाराही मंडळामध्ये अतिवृष्टी, ३५ हजार हेक्टरवर शेतीचे नुकसान

## सर्व तलाव ओव्हरफ्लो, अनेक ठिकाणी रस्ते गेले पाण्याखाली, पूरपरिस्थितीचा धोका कायम

नगर – नगर तालुक्यातील बाराही महसूल मंडळामध्ये २७ सप्टेंबर रोजी रात्री ते २८ सप्टेंबर रोजी सकाळ पर्यंत अतिवृष्टी झाली असून सर्व तलाव पुढे नाले तुडुंब भरून ओव्हर फ्लो झाले आहेत. प्रचंड पावसाच्या पाण्यामुळे जमिनीवरील कांदा, सोयाबीन, कपाशी तूर तसेच इतर पिके सपाट झाली असून जमिनी खरडून गेल्या आहेत. फळबागांमध्ये पाणी साचल्यामुळे यंदाचा फळांचा हंगाम संपण्याच्या मार्गावर आहे. पावसात कुठलीही जीवित हानी झाली नसून शेतीचे मात्र प्रचंड नुकसान झाले आहे.



सारोळा कासार येथील बाबासाहेब हरिभाऊ धामणे यांचे घर पावसामुळे पडले आहे.

नगर तालुक्यात पावसाचा धुमाकूळ सुरूच आहे. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनाही पावसाला आता नको म्हणण्याची वेळ आली आहे या महिन्यात सरासरीच्या दोनशे टक्के पाऊस पडल्यामुळे शेत पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. नगर तालुक्यातील नालेगाव ७१ मिमी, सावेडी ११५ मिमी, कापूरवाडी ८७ मिमी, केडगाव ७६ मिमी, भिंगार ७१ मिमी, नागापूर १२२ मिमी, जेऊर १०० मिमी, चिचोंडी पाटील १३५ मिमी, वाळकी ८० मिमी, चास ६८ मिमी, रुईछत्तीशी ९३ मिमी, नेप्ती ८१ मिमी पाऊस पडला आहे. प्रथमच बाराही महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे प्रशासनाची प्रचंड धावपळ झाली आहे. गर्भगिरी डोंगर रांगांमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे पिंपळगाव माळवी, कापूरवाडी, भातोडी पारगाव तलावामधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग झाला आहे. पिंपळगाव माळी तलावाचे पाणी सीना नदीला मिळाल्यामुळे रात्रीच्या सुमारास नगर शहरातून वाहणाऱ्या सीना नदीला महापूर येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ऐतिहासिक पारगाव भातोडी तलाव पूर्ण क्षमतेने भरला आहे. डोंगर रांगामधील आगडगाव, देवगाव, टोकेवाडी, रतडगाव, बारदारी, मेहेकरी, सोनेवाडी पूर्ण भरले आहे. भातोडी तलावातील सांडव्यातून पाणी पूर्ण क्षमतेने खाली नदी नदीपात्रात येत असल्याने मेहेकरी नदीने उग्र स्वरूप धारण केले आहे. त्यामुळे भातोडी, चिंचोडी पाटील, आठवड या गावातील वाड्या वस्त्या व स्थानिक नागरिकांना खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. कापूरवाडी तलाव लगतच्या सांडव्याला मोकळी वाट करून दिल्यामुळे मोठ्या प्रमाणात विसर्ग झाल्यामुळे नागरदेवळे स्मशानभूमी लगत पाणी आले होते.

सखल भागात पाणी साचल्यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चिचोंडी पाटील मंडळामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### वाकोडीत सीना नदीच्या पुरातून ३२ जणांना सुरक्षितस्थळी

देहरे येथील राजेंद्र झावरे व सीमा कांबळे, देविदास महांडुळे यांच्या घरात तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाणी घुसले होते. जेसीबीच्या साह्याने पाण्याला मोकळी वाट काढून दिल्यामुळे पुढील अनर्थ टळला. वाकोडी परिसरात सीना नदीचे पाणी घुसल्यामुळे चार कुटुंबातील ३२ जणांना सुरक्षित स्थळी हलविल्यामुळे पुढील धोका टळला. चाहूराना बुद्रुक परिसरातील घरामध्ये पाणी शिरले होते त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

### आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे महिलेला जीवदान

चिचोंडी पाटील जवळ असलेल्या केळ तलावालगत असलेल्या वस्तीवरील आदिवासी समाजातील एका महिलेला प्रसूतीवेदना होत होत्या. चिचोंडी पाटील आरोग्य केंद्रातील कर्मचारी हरीश मुंडे, शंकर सरोदे व चालक संजय ठोंबरे हे रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी दाखल झाले. रस्त्याच्या चिखलात रुग्णवाहिका फसली. रात्रीच्या किर्र अंधारात व पूर परिस्थितीत गराडे वस्तीवरील सचिन हजारे, अजय हजारे, वैभव हजारे सोनू भोस यांनी ट्रॅक्टर आणून भर पावसात जीवाची परवा न करता रुग्णवाहिका चिखलातून बाहेर काढली. स्थानिक नागरिक व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे आदिवासी महिलेला जीवदान मिळाले.

### ७५ घरांची झाली पडझड, ८ जनावरे दगावली

नगर तालुक्यातील सुमारे ३५ हजार २१४ शेतकऱ्यांचे ३२ हजार पाचशे ५० हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले. यातील सुमारे १६ हजार हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीचे पंचानामे पूर्ण झाले असल्याची माहिती तहसीलदार संजय शिंदे यांनी दिली. भिंगार मंडळातील ३७, चिचोंडी पाटील मंडळातील २३ व वाळकी मंडळातील १५ घरांची पडझड झाली आहे. चिचोंडी पाटील मंडळातील २४ व वाळकी मंडळातील १२ विहिरी विहिरींचे नुकसान झाले आहे. चिचोंडी पाटील परिसरातील सुमारे ३३ हेक्टर क्षेत्रावरील शेतजमिनी पाण्याच्या प्रवाहामुळे खरडून गेल्या आहेत. तालुक्यात आठ जनावरे दगावल्याची माहिती आहे.

## केडगाव येथून मालट्रकची चोरी

नगर – केडगाव परिसरात लोंढे मळा येथे सॉ मिल समोर उभा केलेला टाटा कंपनीचा मालट्रक (एमएच १९ जे ३६१६) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २७ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० ते २८ सप्टेंबर रोजी सकाळी ८ या कालावधीत घडली आहे. याबाबत शिवाजी बाळासाहेब लोंढे (वय ५५, रा. लोंढे मळा, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिल यांच्याबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु, कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता.२९/०९/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी जिल्हा परिषद हद्दीतील मौजे भिंगार येथील संकल्प कॉलनी भागातील खालील वर्णनाची प्लॉटसह बांधकाम असलेली मिळकत- **सर्व्हे नं. २८५/१ मधील प्लॉट नं.२ चे एकूण क्षेत्रफळ २८५.०० चौ.मी. यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे पश्चिम- उत्तर कोपऱ्यातील ९६.०४ चौ.मी.हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील बांधकाम याचा ग्रामपंचायत मालमत्ता ४०३६ आहे ही लाईट मीटर, नळ कनेक्शन व सर्व तदंगभुत वस्तुसह काही एक राखुन न ठेविता प्लॉटसह बांधकाम असलेली संपुर्ण मिळकत. यांसी चतुःसीमा -**

पुर्वेस :- प्लॉट नं.२ पैकी दक्षिणेस :- प्लॉट नं.२ पैकी
पश्चिमेस :- रस्ता उत्तरेस :- प्लॉट नं.३

वर नमूद मिळकतीचे विद्यमान मालक -
**किशोर मधुकर पराते**
रा. संकल्प कॉलनी, मस्जीद जवळ, बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर.

**अ‍ॅड. समीर वखारे**
पत्ता :- ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९, ९८६०८०५५५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार आमचे आशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर व्यवहारापोटी आमचे आशिलांनी विद्यमान मालकांना विसार रक्कम दिलेली आहे. सदर प्लॉट निर्वेध, निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे, परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर प्लॉटबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष, लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या प्रमाणित नकलांसह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकत वर्णन :-**

जिल्हा तुकडी व पोट तुकडी तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर जिल्हापरिषद हद्दीतील, मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कक्षेतील **मौजे बुरुडगांव** येथील निर्वेध, निजोखमी प्लॉट मिळकत खालील वर्णनाची-

| गट क्रं./ स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १४/२ अ/२अ १/२ ब | २ | ६९४.६५ |

याचा संगणकीय उताऱ्याप्रमाणे गट क्रमांक व उपविभाग १४/२अ/२अ१/२ब/प्लॉट २ याचे क्षेत्र ६.९४.६५ आर.चौ.मी. असा आहे. **यांसी चतुःसिमा :-**

पुर्वेस - ९ मीटर रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ३,
पश्चिमेस - अ‍ॅमिनीटी स्पेस, उत्तरेस - प्लॉट नं. १.

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक -**
**१) श्रीमती. शारदा सुभाषचंद्र बरमेचा,**
**२) श्री. अमित सुभाषचंद्र बरमेचा,**
**३) सौ. दिपाली अमित बरमेचा,**
सर्व रा. बंगला नं. ११, स्वस्तिक हाऊस, श्री सुयोग सोसायटी,सहकार सभागृह रोड, आनंदऋषीजी समाधी जवळ, अहिल्यानगर.

**अ‍ॅड. शामसुंदर व्हि. भुतडा**
ऑफिस : शॉप नं. ९, पुजा अपार्टमेंट सहकार सभागृह रोड, अहिल्यानगर.
मो.नं. ९४२३७९२९२२


## टाटा हॅरियर कारची घरासमोरुन चोरी

नगर – शहरात चारचाकी चोरणाऱ्या चोरट्यांनी पुन्हा एकदा पोलिसांना आव्हान दिले असून, केडगाव देवीरोड परिसरात घरासमोर पार्क केलेली सुमारे १२ लाख रुपये किमतीची टाटा हॅरियर कार अज्ञात चोरट्यांनी रात्रीतून चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सौरभ राजेंद्र शेळके (वय ३२, रा. धनश्री कॉलनी, चिपाडेमळा, केडगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार, सौरभ शेळके यांनी त्यांची कार (एमएच १६ सीवाय ९६९६) २५ सप्टेंबर रोजी दुपारी त्यांच्या घराबाहेर पार्क केली होती. रात्री ११ वाजेपर्यंत कार जागेवर होती.

दुसऱ्या दिवशी, २६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता शेळके कामावर जाण्यासाठी बाहेर आले असता, त्यांना कार जागेवर दिसली नाही. त्यांनी तात्काळ आजूबाजूच्या परिसरात आणि शहरात कारचा शोध घेतला, मात्र ती कुठेही आढळून आली नाही. अखेर आपली कार चोरीला गेल्याची खात्री झाल्यावर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू केले आहे.


## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

Truhome FINANCE

(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

**नोंदणीकृत कार्यालयः** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११ दुसरी गल्ली, सिनातोफा रोड, अलवारपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८;
**मुख्यालय** : लेव्हल - ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

### प्रतिकात्मक ताबा सूचना

तर, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) चे अधिकृत अधिकारी म्हणून खाली स्वाक्षरी केलेले व्यक्ती यांनी सिक्युरिटायझेशन अँड फायनान्शियल अ‍ॅसेट्सचे पुनर्निर्माण आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ (उक्त कायदा) च्या तरतुदींनुसार आणि सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ (उक्त नियम) च्या नियम ३ सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदारांना मागणी नोटिस जारी केल्या आहेत ज्यांचे तपशील खालील तक्त्यात नमूद केलेल्या मागणी नोटिसमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी दिले आहेत. कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी २५/०९/२०२५ रोजी सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम ८ अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला येथे इशारा देण्यात आला आहे की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास येथे नमूद केलेल्या रकमेसाठी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून व्याजासह शुल्क आकारले जाईल. कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

### कर्जदाराचे नाव आणि पत्ता

१. श्री.जाधव रमेश श्रीराम (कर्जदार)
२. सौ.सविता रमेश जाधव (सह-कर्जदार)
३. श्री. श्रीराम सोमा जाधव (सह-कर्जदार)
सध्याचा पत्ता : रेणुका निवास, आखेगाव रोड, एमएसईबी बोर्डजवळ, श्रीकृष्णनगर,शेवगाव, अहमदनगर,एमएसईबी, महाराष्ट्र-४१४५०२
तसेच मालमत्तेचा पत्ता: गट नं.७२४, प्लॉट क्रमांक १४, मालमत्ता क्रमांक-Z1W१००६७९१, ग्रामपंचायत क्रमांक ५२६५, आखेतवाडे, अहमदनगर, महाराष्ट्र- ४१४५०२

### डिमांड नोटीसनुसार देय रक्कम

मागणी सूचना दिनांक ११/०७/२०२५, मागणी सूचना रक्कम- दिनांक ०९-०७-२०२५ रोजी रु. ५६,०५,५२१/-(रुपये छप्पन लाख पाच हजार पाचशे एकवीस फक्त)
आतापर्यंत नमूद केलेले पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्च, खर्च इ.
कर्ज खाते क्रमांक SLPHPNEP0000414

### मालमत्तेचे वर्णन

सर्व तुकडा आणि पार्सल म्हणजे मालमत्ता म्हणजे प्लॉट क्र.१४, क्षेत्रफळ १६०.०० चौ.मी., गट क्र.७२४/१ भाग, शेवगाव, ताल-शेवगाव, जिल्हा अहमदनगर
पूर्वे : रस्ता, दक्षिण : प्लॉट क्र.१३, पश्चिम : प्लॉट क्र.११, उत्तर : प्लॉट क्र.१५

ठिकाण: अहमदनगर
दिनांक: २५.०९.२०२५

सही/-अधिकृत अधिकारी
- ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड


# नगरमध्ये खा.निलेश लंके यांच्याकडून पूरस्थितीची पाहणी

नगर – मागील २४ तासांत तब्बल १३० मिमी पावसाची नोंद झाल्याने २८ सप्टेंबर रोजी नगर शहर व परिसरात सीना नदीला पूर आला आहे. परिणामी नालेगाव, दातरंगे मळा, सताळकर मळा यांसह अनेक भागांत नागरिकांच्या घरात पाणी शिरून जनजीवन विस्कळीत झाले आहे. गंभीर परिस्थितीची दखल घेत खा. निलेश लंके यांनी स्वतः पूरग्रस्त भागात जाऊन पाहणी केली. ते पाण्यात उतरून नागरिकांपर्यंत पोहोचले, त्यांच्या हालअपेष्टा जाणून घेतल्या व आवश्यक मदतीचे आश्वासन दिले.



नगर शहरातील पूरपरिस्थितीची पाहणी करताना खा. निलेश लंके व पदाधिकारी.

यावेळी खासदार लंके यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना तात्काळ नुकसानीची नोंद घेऊन रेस्क्यू व आपत्ती व्यवस्थापन पथके पाठविण्याचे निर्देश दिले. तसेच महा वितरण अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून, पाण्यात करंट जाण्याचा धोका टाळण्यासाठी वीजपुरवठा सुरक्षित करण्याचे आदेश दिले. पाहणी दरम्यान नगरसेवक योगिराज गाडे, विक्रम राठोड, दिलदारसिंग बिर, गिरीश जाधव, मंदार मुले, राकेश बोगावत, प्रथमेश महिंद्रकर, ओम काले, शुभम मिरांडे, महेश शेलके, अक्षय नागपूरे आदी उपस्थित होते.

### नागरिकांना दिलासा आणि आवाहन

खासदार लंके यांनी नागरिकांच्या तक्रारी शांतपणे ऐकून घेतल्या व परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत सुरक्षित स्थळी हलविण्याचा सल्ला दिला. तसेच पूरामुळे शेती, घरे व जनावरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सरकारने तात्काळ 'ओला दुष्काळ' जाहीर करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खासदारांनी केली.

### हेलिकॉप्टरच्या मदतीसाठी लष्कराशी संपर्क

देवटाकळी तालुका शेवगाव येथे २८ सप्टेंबर रोजी सकाळी पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी खासदार लंके यांच्याकडून लष्कर प्रशासनाशी संपर्क करून हेलिकॉप्टर ने मदत करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर लष्कर प्रशासनाने तत्काळ हेलिकॉप्टर पाठवून नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवले.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने अहिल्यानगर शहरात रविवारी सकाळी शहरात रिमझिम पावसात शिस्तबद्ध पथसंचलन झाले.

# नगर शहर रिमझिम पावसात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून शिस्तबद्ध संचलन व शस्त्रपूजन

नगर – विजयादशमी उत्सवा निमित्त अहिल्यानगर शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने रविवारी सकाळी शहरातील ५ विविध भागांमध्ये रिमझिम पावसात पथसंचलन व शस्त्र पूजन झाले. संचलनात सहभागी स्वयंसेवक संघाच्या संपूर्ण गणवेशात हातात दंड घेवून सहभागी झाले होते. संघाच्या घोष पथकातील विविध वाद्यांच्या तालावर हे संचालन शिस्तबद्ध पणे मार्गस्त झाले. यावेळी स्वयंसेवक व नागरिक सहभागी झाले होते.

रविवारी सकाळी मार्केटयार्ड भागातून निघालेल्या पथ संचलनाचे परिसरातील नागरिकांनी स्वागत केले. सिताबन लॉन येथे झालेल्या कार्यक्रमात आ.संग्राम जगताप व शहर कार्यवाह हिराकांत रामदासी यांच्या हस्ते शस्त्रपूजन झाले. यावेळी उद्योजक गौतम मुनोत व प्रमुख वक्ते अहिल्यानगर दक्षिण जिल्हा सहकार्यवाह दिनेश करंडे उपस्थित होते.

# अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसच्या नगर शहराध्यक्षपदी जय चव्हाण यांची नियुक्ती

नगर – अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस (७२६२) कामगार ट्रेड युनियन महाराष्ट्र प्रदेश (दिलीप अन्नाजी चागंरे प्रणीत) यांच्या वतीने जय अर्जुन चव्हाण यांची अहिल्यानगर शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप अन्नाजी चागंरे यांच्या मार्गदर्शनाखाली व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रकाश चमके यांच्या हस्ते ही नियुक्ती करण्यात आली.



चव्हाण यांनी समाज व कर्मचारी यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आल्याचे चमके यांनी नियुक्तिपत्रात नमूद केले आहे. संघटनेच्या संविधानानुसार चव्हाण यांनी आपल्या कार्यकाळात कर्मचारी हितासाठी प्रभावीपणे काम करावे तसेच तातडीने कार्यकारिणी गठीत करून केंद्र व राज्य संघटनेकडे सादर करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

यावेळी जय अर्जुन चव्हाण म्हणाले की, झालेली नियुक्ती ही माझ्यासाठी अभिमानाची व जबाबदारीची गोष्ट आहे. दिलीप चागंरे व प्रकाश चमके यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास मी कधीही व्यर्थ जाऊ देणार नाही. सफाई मजदूर बांधवांच्या प्रश्नांसाठी, त्यांच्या हक्कासाठी व सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी मी सदैव लढा देणार आहे. कामगार बांधवांचे हित जोपासणे, त्यांना न्याय मिळवून देणे आणि संघटन अधिक बळकट करणे हे माझे पहिले कर्तव्य राहील. तातडीने कार्यकारिणी गठीत करून संघटनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रयत्नशील राहीन व अहिल्यानगरमधील सर्व सफाई मजदूर बांधवांसाठी २४ तास उपलब्ध राहणार असल्याची भावना व्यक्त केली.

